

दोन पाली भगिनींची प्रेमभेट.

किंमत ६० पैसे

# अनुक्रमणिका – ऑगस्ट १९७७


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | — | |
| २) | आदरणीय श्रीराधाकृष्ण स्वामी | — | सदानंद चेंदवणकर |
| ३) | सद्गुरु अगदी पाठीशीच उभे आहेत | — | श्री. र. श्री. पुजारी |
| ४) | श्रीसाईबाबा आमच्याकडे असे आले | — | सौ. सीमंतीनी तेंडुलकर |
| ५) | श्रीबाबांना हवे असलेले दोन पैसे – "श्रद्धा व सबुरी" | — | श्री चकोर आजगांवकर |
| ६) | साईभक्त जेव्हा अचानक भेटतात | — | सौ. उषाताई मुळे |
| ७) | पाऊले चालली शिरडीची वाट | — | श्री. मनुभाई शहा |
| ८) | गुरुपौर्णिमा उत्सवातील उद्बोधक विचार | — | श्रीअवधुत स्वामी |
| ९) | बाबा भक्तांना सांभाळतात | — | श्री. स. स. देशपांडे |
| १०) | विश्वास नव्हता तो बसला | — | सौ. मालती वैकर |
| ११) | दोन अनुभव | — | श्री. अनिल रसाळ |
| १२) | तुमचे दत्तात्रेयासंबंधीचे सामान्य ज्ञान | — | सदानंद चेंदवणकर |
| १३) | ग्रंथभेटीचा स्वीकार | — | — |
| १४) | श्रीसाईबाबांचे मंदिर व आश्रम | — | डॉ. श्री. दि. परचुरे |
| १५) | शिरडीवृत्त | — | — |
| १६) | इच्छा - दर्शन | — | सौ. सुशिलाबाई हजारे |
| १७) | श्रीसाईलीला | — | सौ. शांता सरोदे |
| १८) | क्षमा करा श्रीसाईनाथा | — | श्री. उत्तम ज. मयेकर |
| १९) | माझा साई | — | सौ. उषा प्र. अधिकारी |
| २०) | श्रीसाई प्रार्थना | — | प्रा. गुंडेराव पटवारी |
| २१) | घेऊनी साई साई नाम | — | श्री. सुभाष वैद्य |
| २२) | ओवाळू आरती श्रीसाईनाथा | — | सौ. प्रिया श. नाबर |
| २३) | साई अवतारी शिरडी नगरी | — | प्रि. श्री. एम. एम. अमिनगड |
| २४) | परमहंस साईनाथ | — | सती कमलाताई उपासनी महाराज |
| २५) | स्मरू नित्य साई समर्थ | — | कै. दत्तकुमार कळसकर |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

झालों जरी गतप्राण ।
वाक्य माझें मानां प्रमाण ।
माझीं हाडें तुर्बतीमधून ।
देतील आश्वासन तुम्हांस । ॥ १०५ ॥

मी काय पण माझी तुर्बत ।
राहील तुम्हांसवें बोलत ।
जो तींस अनन्य शरणागत ।
राहील डोलत तयासवें ॥१०६॥

डोळयाआड होईन ही चिंता ।
करूं नका तुम्ही मजकरितां ।
माझी हाडें ऐकाल बोलतां ।
हितगुज करितां तुम्हांसवें ॥ १०७ ॥

मात्र माझें करा स्मरण ।
विश्वासयुक्त अंतःकरण ।
ठेवा करा निष्काम भजन ।
कृतकल्याण पावाल ॥ १०८ ॥

हे भक्त कामकल्पतरो ।
समर्थ साई श्रीसद्गुरो ।
हेमाड तुझिया चरणा न अंतरो ।
भाकी परोपरी हे करुणा ॥ १०९ ॥

— श्रीसाईसच्चरित - अध्याय २५ वा.

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] ऑगस्ट ७७ [ अंक ५

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

**स. न. वि. वि.**

# अधिक महिना – पुरुषोत्तम मास

श्रीसाईभक्त प्रेमीनो, भगवंताचे मनोभावे पूजन-अर्चन करणाऱ्या भाविकांनो, बाबांवर, परमेश्वरावर नितांत श्रद्धा बाळगणाऱ्या भक्तांनो यावर्षी आपल्या हिंदू पंचांगात वर्षाचे तेरा महिने दाखविलेले आहेत. हा जादा झालेला तेरावा महिना हा श्रावण पण अधिक श्रावण या नावाने लिहिलेला आहे. दिनांक १७ जुलै ते १४ ऑगस्टपर्यंत हा अधिक श्रावण सांगण्यात आलेला आहे. या अधिक महिन्याला मलमास, पुरुषोत्तम मास, किंवा धोंडा महिना असे म्हणतात. आपले महिने हे चांद्र महिने आहेत व ऋतु हे सौर म्हणजे सूर्यावर अवलंबून आहेत. हे चांद्र महिने ठराविक ऋतूत येण्यासाठी चांद्र महिन्यांचा आणि सूर्याच्या राशीप्रवेशाचा मेळ घालण्यात आलेला आहे, व यामुळेच हे असे अधिक महिने येतात. एकाच महिन्यात एकाच नावाचे जेव्हा दोन महिने येतात; तेव्हा पहिल्या महिन्यास 'अधिक मास' व दुसऱ्या महिन्यास नेहमीचा 'निज मास' असे म्हणतात. १७ जुलै ते १५ ऑगस्ट या काळात दोन चांद्रमासांचा प्रारंभ होतो त्यामुळे या दोन्ही महिन्यांना श्रावण हेच नाव द्यावे लागलेले आहे..पण पहिल्या महिन्याला 'अधिक श्रावण' व दुसऱ्या महिन्याला 'निज श्रावण' अशी नावे देण्यात आलेली आहेत. अधिक महिना हा मराठी महिन्यात कोणत्याही महिन्यात येऊ शकतो पण यंदा श्रावणात आलेला हा अधिक महिना बरोबर एकोणीस वर्षांनी आलेला आहे. यापूर्वी अधिक श्रावण सन १९५८, १९३९, १९२०, १९०१ या साली आला होता. यानंतर पुन्हा अधिक श्रावण १९ वर्षांनी म्हणजे १९९६ साली व त्यानंतर २०१५ साली येईल.

या अधिक मासासंबंधी अनेक रंजक कथा आपल्या प्राचीन साहित्यातून आढळतात.

अधिकमासाला 'पुरुषोत्तम मास' असेही म्हणतात. पण या अधिक मासाचे पुरुषोत्तम मास हे नामकरण कसे झाले या संबंधीची मोठी रंजक कथा आहे. फार

पूर्वी म्हणजे द्वापार युगात लबाडीने फासे टाकून कौरवांनी पांडवांना हरविले व वनवासाला पाठविले. भगवान श्रीकृष्णाने त्यांना तिथे अधिकमासाची कथा ऐकवली. जेव्हा एकदा अचानक अधिकमास आला तेव्हा लोक त्याला मलमास म्हणून चिडवू लागले. त्यामुळे तो तक्रार घेऊन श्रीकृष्णाकडे गेला. विधवेला ज्याप्रमाणे शुभकार्यात टाळतात त्याप्रमाणे मलमासास शुभकार्यात लोक टाळू लागले. याबद्दल अधिकमासाने श्रीकृष्णाकडे तक्रार केली. तेव्हा श्रीकृष्णाने अधिकमासाला गोलोकामधे पुरुषोत्तमाकडे नेले तिथे पुरुषोत्तमाने अधिकमासाचे नाव बदलून त्याचे नाव पुरुषोत्तम मास असे ठेवले; व त्याला आशीर्वाद देऊन सांगितले की, 'तुझे पूजन जे करतील त्यांचे मनोरथ पूर्ण होतील. दर पावणेतीन वर्षांनी येणाऱ्या या मासात जे स्नान, पूजा, दान, जप करतील त्यांच्यावर मी प्रसन्न होईन.' या आशीर्वादामुळे अधिकमास हा सामर्थ्यवान पुरुषोत्तम मास बनला. पुढे श्रीकृष्णाने पांडवांना पुरुषोत्तम मासाचे व्रत पाळण्यास सांगितले. तेव्हा या पुरुषोत्तम मासाचे व्रत पाळताना श्रीकृष्णाने पांडवांना द्रौपदीच्या पुनर्जन्माची गोष्ट सांगून पुरुषोत्तम मासाचे महत्त्व सांगितले ती कथा अशी—

मेधावी नावाच्या एका पोरक्या ब्राम्हण कन्येला दुर्वासमुनींनी पुरुषोत्तममासात पुरुषोत्तम व्रत करावयास सांगितले. पण त्या मुलीने दुर्वासमुनींना पुरुषोत्तम मासाबद्दल 'मलमास' असा शब्द वापरून अपमानकारक उत्तर दिले. त्यामुळे दुर्वासमुनी रागावले. त्यांनी तिला ह्या जन्मी किंवा पुढल्या जन्मी तुला प्रायश्चित्त भोगावे लागेल असा शाप दिला. त्यामुळे मेधावी घाबरून गेली व तिने भगवान श्रीशंकराची मनोभावे आराधना केली. तेव्हा श्रीशंकर प्रसन्न झाले. त्यांनी तिला वर माग असे सांगितले तेव्हा ती आनंदित झाली व म्हणाली, 'देवा मला पती द्या, पती द्या, पती द्या, पती द्या, पती द्या' असे पाच वेळा म्हणाली. शंकरानी 'तथास्तु' म्हटले. पण पती द्या असे पाच वेळा म्हटल्यामुळे स्वतःला पाच पती मिळतील या भीतीने ती मरण पावली. पुढे द्रुपद राजाच्या यज्ञकुंडातून ती पुन्हा जन्मास आली त्यामुळेच की काय तिला द्रौपदी असे नाव मिळाले. अधिकमासाची निंदा नालस्ती केल्यामुळे व पुढे शंकराकडे वर मागताना चूक झाल्यामुळे द्रौपदीला पाच पती लाभले ही कथा सांगून श्रीकृष्णाने पांडवाना पुरुषोत्तम व्रत आचरण्यास सांगितले.

भगवान श्रीविष्णूंनीसुद्धा श्रीलक्ष्मीला पुरुषोत्तम व्रत म्हणजे नेमके काय करावयाचे ते सांगितले आहे. महिनाभर उपोषण, एक दिवसा आड उपोषण, एकवेळीच भोजन किंवा मौन भोजन हे या पुरुषोत्तम मासात महत्त्वाचे व्रत आहे. वाईट सवयींचा किंवा आवडत्या वस्तूंचा त्याग याच महिन्यात करावयाचा असतो. अपूप

म्हणजे अनारसे, मेवामिठाई इत्यादींचे सुयोग्य माणसाला दान करावे. गाईचे दान केल्याने तर महान पुण्य मिळते. दीपदान केल्याने जन्माचे सार्थक होते. हे पुण्य वेळ प्रसंगी दुसऱ्यालाही बहाल करता येते. अधिकमासात नकळत घडलेले पुण्यही फळांस येते. याविषयी एक रंजक कथा श्रीविष्णूंनी श्रीलक्ष्मीला ऐकविली ती थोडक्यात अशी.

इंद्रलोकामध्ये स्मितविलासिनी नावाची एक अप्सरा होती. ती एकदा आपल्या इष्टमैत्रिणींसह पृथ्वीतलावर आली. पृथ्वीवरील सुगंधी फुले वेचून तिने सुन्दर हार गुंफला. पण तो कुणाच्या गळयात घालायचा हे तिला कळेचना. तेवढ्यात तिथे दुर्वास ऋषी आले व तिने तो हार त्यांच्या गळयात घातला. एका अप्सरेने आपल्या गळयात हार घातला हे पहाताच दुर्वासमुनी अतिशय रागावले, संतप्त झाले. त्यांनी तिला तू पृथ्वीतलावर पिशाच्च होऊन भटकत राहशील असा शाप दिला. स्मितविलासिनी घाबरली व दुर्वास मुनींची क्षमा मागू लागली. तेव्हा कुठे दुर्वास मुनींचा राग शांत झाला. त्यांनी शापाची तीव्रता कमी करण्यासाठी उपाय सांगितला. ते म्हणाले, 'दक्षिणेस कुमारी क्षेत्री याज्ञवल्क्य कुळातील एक स्त्री तपश्चर्या करण्यासाठी येईल. या काळात अधिकमास आला की ती उपवास करून दीपपूजा करील. अमावास्येच्या दिवशी तू तिथे जाऊन तिला शरण जा म्हणजे ती तिचे पुण्य तुला देईल व तुझी पिशाच्चयोनीतून सुटका होईल.' याप्रमाणे पिशाच्च झालेल्या अप्सरेने केले व स्वतःचा उद्धार करून घेतला.

असो, या अधिक महिन्यात काय वर्ज्य करावे हे शास्त्रात सांगितलेले आहे. नित्यनैमित्तिक कर्मे व श्राद्ध कर्मे या अधिकमासात करण्यास हरकत नाही. परंतु चौल, मुंज, विवाह, गृहारंभ, गृहप्रवेश, नवे वस्त्र, अलंकार धारण, पूर्वी राहिलेला नामकरणविधी इ. संस्कार व कार्ये या अधिकमासात करू नयेत. तसेच महत्त्वाच्या कार्याचा आरंभ व समाप्तीपण करू नये. नित्यकर्मे व नैमित्तिक कर्मे या मासात करण्यास मुळीच हरकत नाही. हेमाद्रीपद् पुराणात असे म्हटले आहे की, या मासात गूळ व तूप यांनी युक्त असे ३३ अपूप म्हणजे अनारसे किंवा घारगे देवांच्या नावाने दान केल्यास पृथ्वीदानाचे पुण्य मिळते व दान करणाऱ्यास विपुल लक्ष्मी पुत्रपौत्रादी संपत्ती मिळते.

.............

# अखिल भारतीय श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष परमआदरणीय श्री राधाकृष्ण स्वामी

● सदानंद चेंदवणकर
१२०/४०५५ राधामाधव,
टिळक नगर, चेंबूर, मुं. ८९



श्रीराधाकृष्ण स्वामी

लांबचलांब भरघोस पांढरीशुभ्र दाढी, अंगावरून लपेटलेले पांढरे स्वच्छ धूत वस्त्र, सदा हसतमुख, प्रसन्न पण तेजस्वी चेहरा असलेली एक वयोवृद्ध साईभक्त तपस्वी व्यक्ती आज आमच्यात आहे. श्रीसाई-बाबांच्यावरची गाढ श्रद्धा व भक्ती, त्यांचे जपजाप्य, नामस्मरण, साईभक्तीचा प्रचार–प्रसार इ० सेवाकार्यामुळेच की काय आज त्यांची नियुक्ती अखिल भारतीय साईसमाज, मद्रास या ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्थेच्या अध्यक्षपदी करण्यात आलेली आहे. एक उच्च दर्जाचे ऋषीतुल्य संत म्हणून सारा भारत त्यांना ओळखतो. भारतातीलच नव्हे तर परदेशातील अनेक ज्येष्ठ–श्रेष्ठ व्यक्तीसुद्धा त्यांना अत्यादराने वंदन करतात. या परम आदरणीय सत्-पुरुषाचे नाव आहे श्रीराधाकृष्ण स्वामी. ‘साई पादानंद’ या नावानेही ते सर्वत्र परिचित आहे. स्वामीजींच्या शुभहस्ते

भारतातील कित्येक श्रीसाई मंदिरांचे पायाभरणी समारंभ पार पडलेले आहेत तर कित्येक मंदिरातून बाबांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. अगदी अलिकडे म्हणजे गेल्या २८ एप्रिल रोजी साईनाथ मंदिर, शिवाजी नगर पुणे येथील मंदिराचा उद्‌घाटन सोहळा त्यांचेच शुभहस्ते साजरा करण्यात आलेला होता.

गेल्या अनेक वर्षापासून ऋषीतुल्य जीवन कंठीत असलेले श्रीराधाकृष्ण स्वामी मूळ दक्षिण भारतातले. त्यांचा जन्म १५ एप्रिल १९०२ रोजी त्रिचनापल्ली जिल्ह्यातील पोय्यामोझी या एका खेडेगावात झाला. या पोय्यामोझी शब्दाचा अर्थ कुणीही असत्य बोलत नाही असा आहे. स्वामीजींच्या वडीलांचे नाव डी. वेंकटरमण अय्यर व मातोश्रींचे लक्ष्मी अम्मा. अय्यर दांपत्याला तीन पुत्र व एक कन्या अशी अपत्यसंपदा लाभली. अय्यर घराणे मोठे सुखवस्तू व श्रीमंत होते खरे पण लहानपणापासूनच छोट्या स्वामीजींचे सारे लक्ष देव–देवतांच्या पूजनाकडे असायचे.

स्वामीजींचा जन्म झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांची आई त्यांना आपल्या गावातील एका मंदिरात घेऊन गेली. त्यावेळी त्या मंदिरात **राधाकल्याण** उत्सव थाटात चालू होता तो पाहून लक्ष्मी अम्माला काय वाटले कुणास ठाऊक तिने आपल्या या बाळाचे नाव राधाकृष्ण असेच ठेऊन दिले, व तेच नाव आज कायम झाले.

स्वामीजींचे शिक्षण पोय्यामोझी येथेच झाले. १९१९ साली ते मद्रास विश्वविद्यालयाची मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. शाळेत असताना ते एक चांगल्यापैकी विद्यार्थी म्हणून ओळखले जात. विशेषतः धार्मिक गोष्टींकडे त्यांचा जास्त ओढा होता. मॅट्रिक नंतर त्यांनी उच्च शिक्षणाकरिता मद्रासच्या एस. पी. जी. कॉलेजात प्रवेश केला खरा पण तिथे त्यांचे मन रमेना तेव्हा कॉलेज शिक्षणाला कायमचा रामराम ठोकून ते मुंबईस आले; व त्यावेळी मुंबईत निघत असलेल्या 'डेली मेल' या इंग्रजी वृत्तपत्रात त्यांनी रिपोर्टरची नोकरी पकडली पण त्या नोकरीतही त्यांचे मन फार काळ लागले नाही व ती नोकरी सोडून देऊन त्यांनी एन. राधाकृष्णन या कंपनीत अकाऊन्टस ऑफिसर म्हणून नोकरी पकडली. याच कंपनीत असलेल्या त्यांच्या एका मित्राने त्यांना श्रीसाईबाबांचे छायाचित्र भेटीदाखल दिले व तेव्हापासून स्वामीजी त्या छायाचित्राकडे जे आकर्षिले गेले ते अगदी आजतागायत.

आपले सारे जीवन परमेश्वराच्या भक्तीसाठी व जनतेच्या कल्याणासाठी, परोपकारासाठी आहे अशी स्वामीजींच्या मनाची पकड ऐन तारुण्यात बसली. स्वामीजींच्या वडिलांच्या कुळातली देवता म्हणजे गुणशेखर श्री निवास व आईच्या घराण्यातील मूळ देवता म्हणजे कामाक्षी या दोन्ही देवतांचे भजन-पूजन-अर्चन अत्यंत

मनोभावे त्यांच्या घरात होत असे; व त्याचे संस्कार छोट्या स्वामीजींवर झाल्यास नवल नाही. स्वामीजी जेव्हा –सात–आठ वर्षांचे होते तेव्हाची गोष्ट. एका मध्यरात्री त्यांच्या घरातला पूजेच्या खोलीचा दरवाजा आतून ठोठावला गेला. घरातली सारी मंडळी गाढ झोपी गेली होती. ठोठावण्याच्या आवाजाने आई किंचित्सी जागी झाली पण तिला वाटले असेल मांजर-बिंजर, म्हणून ती पुन्हा निद्रावश झाली. छोटे स्वामीजी धीर करून उठले व त्यांनी कानोसा घेतला. आतून कुणीतरी सांगत होते. दरवाजा उघड. धीर धरून छोट्या स्वामींनी दरवाजा उघडला तो काय आश्चर्य ! साक्षात् हिरवे लुगडे नेसलेली व कपाळावर ठसठशीत तांबडे लाल कुंकु लावलेली ती कामाक्षी देवी होती. तिने स्वामीजींना दर्शन दिले इतकेच नव्हे तर गच्चीवर त्यांना खेळावयास ती घेऊन गेली. स्वामीजी जेव्हा थकले तेव्हा जा आता जाऊन झोप म्हणून देवींने त्यांना निरोप दिला. वयाच्या आठव्या वर्षी अशाप्रकारे कामाक्षी देवतेचे दर्शन स्वामींना लाभल्याची ही सत्यकथा आहे.

स्वामीजी असेच एकदा पुण्याहून मुंबईस चालले होते. १९२२ साल होते ते. वाटेत कार्ला येथील देवीचे दर्शन त्यांनी घेतले पण तेथल्या गुहांचे त्यांना काय आकर्षण वाटले कुणाला ठाऊक ! त्यांनी आपला पुढील मुंबईचा प्रवास स्थगित केला व कार्ल्याच्या एका गुहेत ते अठ्ठेचाळीस दिवस राहिले तेथल्या लोकानी दिलेल्या चपाती व दुधावर ते राहिले. सेहेचाळीसाव्या दिवशी त्यांना भगवान दत्तात्रेयानी साक्षात् दर्शन दिले व जगाच्या कल्याणासाठी तुझा जन्म झालेला आहे असा संदेश दिला. अशाप्रकारे स्वामीजींना आपल्या उभ्या आयुष्यात आपल्या इष्ट देव-देवतांनी दर्शन दृष्टांत दिलेला आहे. त्यासंबंधी सांगावयाचेच झाले तर अनेक पानेच्या पाने भरतील.

स्वामीजींना १९२७ साली परमदत्त उपासक श्रीनारायण महाराज यांचा जवळून सहवास लाभला. श्रीनारायण महाराज हे महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही ठिकाणी एक सिद्धीसंत म्हणून ओळखले जात होते. १९२७ साली म्हैसूरच्या महाराजांचा मुक्काम उटी येथे असताना नारायण महाराज तिथे होते. स्वामीजी पण तिथेच होते तेव्हा नारायण महाराज दरदिवशी स्वामीजींना बोलावून पुरुषसूक्ताचे पठण त्यांचेकडून करून घेत. त्यांचेकडून स्वामीजींना दत्तमंत्राचा लाभ झाला.

१९२२ सालापर्यंत श्रीराधाकृष्ण स्वामीजी त्रिची येथेच होते परंतु पुढे १९२२ ते १९४२ पर्यंत त्यांनी आपल्या कुटुंबातील सर्वांशी संबंध सोडले व ते फर्नहिल उटी येथे अगदी एकांतवासात राहू लागले. याच काळात त्यांना भगवान श्रीसाईंनी

साक्षात् दर्शन देऊन परहित साधण्याकडे आपले सारे आयुष्य वेचण्याचा बहुमोल संदेश दिला. पुढे १९४२ साली श्रीनरसिंह स्वामीजींच्या सूचनेवरून स्वामीजी बंगलोरला आले. १९४३ साली नरसिंहजींनी "श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरची" स्थापना केली. या सेंटरसाठी त्यांना स्वामीजींचे संपूर्ण सहकार्य हवे होते व स्वामीजीं-कडून ते त्यांना संपूर्णपणे मिळाले ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. स्वामीजी नरसिंह-स्वामींना आपले गुरु मानतात. आज स्वामीजींचे पश्चात् श्रीराधाकृष्णस्वामी या संस्थेचे सूत्रधार म्हणून ओळखले जातात. तसेच मैलापूर मद्रास येथे स्थापन झालेल्या "दि ऑल इंडिया साई समाजाचे' श्री राधाकृष्णस्वामी १९६२ सालापासून अध्यक्ष आहेत. श्रीसाईभक्तीचा व श्रीसाईबाबांच्या तत्वज्ञानाचा जगभर प्रसार–प्रचार करणे हा या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. या संस्थेसाठी आपले सारे उर्वरित आयुष्य वेचण्याचा स्वामीजींनी निश्चय केला आहे.

श्रीराधाकृष्ण स्वामी यांचा विवाह १९४७ साली झाला. त्यांच्या सौभाग्यवती पार्वती अम्मल या तंजावर जिल्ह्यातील आहेत. या दांपत्याला अपत्यसंपदा नाही. स्वामीजींनी आपल्या श्रीसाई कार्य प्रचारार्थ सबंध भारताचा प्रवास केला असून ठिकठिकाणी साईमंदिरे व श्रीसाई मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. श्रीस्वामीजी उत्तम प्रकारचे लेखक, ही आहेत त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून त्यापैकी पातंजल योगसूत्र हे पुस्तक मौलिक आहे. ते इंग्रजी, हिंदी, तामिळ, तेलगू, कानडी इ. भाषा अस्खलीतपणे बोलतात. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ते सदा आनंदी आहेत. राम-नामाचे स्मरण ते आपल्या मुखातून नेहमीच करीत असतात. स्वामीजींच्या वयाला १९७६ साली ७५ वर्षे पूर्ण झाली त्यावेळी त्यांचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येऊन समर्पण नावाचा ग्रंथ त्यांना अर्पण करण्यात आला होता. श्रीराधाकृष्णस्वामी-जींना दीर्घायुष्य लाभो आणि श्रीसाई सेवेचा, भक्तीचा, तत्वज्ञानाचा प्रसार–प्रचार अखंडपणे त्यांच्या हातून चालो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

...............

# सद्गुरू अगदी पाठीशीच उभे आहेत

● र. श्री. पुजारी

रमानिवास, ९९२ सदाशिवपेठ, पुणे ३०

● पुणे येथील श्री. गोपाळ नारायण आंबेडकर या अबकारी खात्यातील एका माजी नोकराची ही कथा आहे.

श्री. आंबेडकर ठाणे जिल्ह्यातील जव्हार संस्थानातील एक अंमलदार. पण त्यांचे ग्रह फिरले. नोकरीत काही तोहमत आली. नोकरी सोडून घरी स्वस्थ बसले.

साहजिकच सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली.

अशी एक नव्हे, दोन नव्हे तर सात वर्षे गेली.

दरवर्षी शिरडीस यावे. श्रीबाबांपुढे आपल्या हालअपेष्टांचे गाऱ्हाणे घालावे. त्यांच्या पायी लोटांगण घ्यावे. म्हणावे, "देवा, आपल्या एका लेकराची ही दीन अवस्था पाहून तुम्हास अजूनही करुणा उपजत नाही काय ? सर्वांचे सुखकर्तें, दुःखहर्तें असे तुम्ही मायबाप. आमच्यासारख्यांनी तुम्हाकडे धाव घ्यायची नाही तर कोणाकडे ?"

असे होता होता एका वर्षी आंबेडकरांनी बायकामुलांसकट शिरडीस दोन महिने मुक्काम केला. रोज सकाळ-संध्याकाळ श्रीबाबांची करुणा भाकू लागले. पण श्रीबाबांचे उत्तर एकच : थोडी कळ काढ. आपला भोग आहे, तो भोगला पाहिजे बाबा. अशी घाई उपयोगाची नाही.

एक दिवस त्या आंबेडकरांच्या मनाचा धीर सुटला. तिन्हीसांजेची वेळ झालेली पाहिली. मनाशी विचार केला : या कातरवेळेला मी विहिरीत उडी टाकली तर कोणाच्या काय ध्यानी येणार ? उद्या सकाळी विहिरीतून वर येईन तो मृतावस्थेत ! त्यावेळी मनाला डसलेले हे चिंतेचे इंगळही माझ्या बरोबरच मेलेले असतील. सर्व काही खळबळ पूर्ण शांत झालेली असेल.

दीक्षित वाड्यासमोरील एका मोडक्या बैलगाडीवर आंबेडकर त्यावेळी वाऱ्याला बसले होते. ते तेथून उठले. समोरील एका काळोख्या, भयाण विहिरीकडे

निघाले. तोच चार पावलावरील खानावळीचे मालक श्री. सगुण मेरू नाईक आतून येऊन आपल्या खानावळीच्या बाहेरील उंबऱ्यावर उभे!

त्यांच्या हातात श्रीअक्कलकोट महाराजांची पोथी होती. ती पोथी श्री. आंबेडकर यांना दाखवून श्री. सगुण मेरू नाईक म्हणत होते, 'ही पोथी तुम्ही कधी वाचली आहे काय? वाचली नसेल तर जरूर वाचा. ही घ्या ती पोथी.'

श्री. आंबेडकर यांनी पोथी उघडली. समोर आली ती पोथीमधील श्रीस्वामींची लीला ते वाचू लागले. ती लीला अशी होती—

'श्रीस्वामींची स्वारी अक्कलकोटी असता महाव्याधी झालेला एक मनुष्य एकदा तेथे आला. त्याने श्रीस्वामींची पुष्कळ सेवा केली. पण व्याधी मागे हटेना. उलट दिवसेंदिवस वाढूच लागली. यामुळे निराश होऊन एका अंधाऱ्या रात्री त्याने विहिरीत उडी घेतली. पण श्रीस्वामींचे भक्तप्रेम असे की त्याच क्षणी तेथे प्रकट होऊन श्रीस्वामींनी त्याला स्वहस्ते बाहेर काढले. श्रीस्वामी त्याला म्हणाले: अरे, आपला भोग आहे, तो भोगला पाहिजे बाबा. थोडी कळ काढ. असा जीव देऊ नको. जर देशील तर तोच भोग पुढच्या जन्मी तुझ्या उरावर बसेल.'

या एकाच लीलेत साईसच्चरितकारांनी दोन लीला सांगितल्या आहेत. एक श्रीबाबांची आहे. दुसरी श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोटनिवासी यांची आहे.

दोन्ही लीलांतील भक्त व्याधिग्रस्त आहेत.
एकाची व्याधी मनाची आहे. दुसऱ्याची शरीराची आहे.
एक दारिद्र्याने पीडित आहे. दुसरा महारोगाने पीडित आहे.
दोघेही सद्‌गुरूंच्या चरणी धरणे धरून बसले आहेत.

परंतु व्याधी क्षणाक्षणाला भेसूर रूप धारण करीत आहे. धीर खचत्रीत आहे. फार काय, सद्‌गुरूंवरील श्रद्धेलाही तडा निर्माण करीत आहे.
या सर्वांचा परिणाम म्हणजे स्वतःला मृत्यूच्या खाईत लोटून देणे!

नेमक्या याच क्षणी दयावंत सद्‌गुरू त्यांचे रक्षण करीत आहेत. त्यांना योग्य मार्ग दाखवीत आहेत. जणू सद्‌गुरू त्यांच्या मागेच, अगदी पाठीशीच उभे आहेत.

.............

# श्रीसाईबाबा आमच्याकडे असे आले !

● सौ. सीमंतिनी श्यामसुंदर तेंडुलकर
नवा ७१०, सदाशिवपेठ, पुणे ३०

● माझे आजचे वय ६३ ! पण बालपणापासून मी संतांचे एक लाडावलेले लेकरू आहे. अगदी महात्मा गांधीचेसुद्धा ! मी प्राथमिक शाळेत शिकत असता अलिबाग येथे महात्मा गांधीजी आले होते. त्यांच्या समारंभात स्वागतगीतात मी भाग घेतला होता. हातसुताच्या जाड खादीचा पोषाख आम्ही केला होता. महात्माजींनी मला जवळ बोलावून विचारले, "हा कपडा तुला आवडतो का ?" मी सरळ उत्तर दिले, "मला नाही आवडत असला जाड कपडा." शिक्षकिणींनी माझ्यावर डोळे वटारले. पण मी स्पष्ट व खरे बोलल्याबद्दल महात्माजींनी माझी पाठ थोपटून कौतुक केले.

चौदा-पंधरा वर्षांची असताना पुण्यात होते. त्यावेळी केडगावचे श्रीनारायण महाराज पुण्यात आले असल्याचे कळले. मी भावाबरोबर त्यांच्या मुक्कामी दर्शन घेण्यास गेले. गर्दी मी म्हणत होती. दर्शन कसे घडेल असा प्रश्न मला पडला. पण स्वतः महाराजांनी मला बोलावून जवळ घेतले व पटकन एक खडीसाखरेचा खडा काढून हातावर ठेवला.

वयाच्या नवव्या वर्षापासून मला श्रीमाधवनाथांविषयी प्रेम उत्पन्न होऊन त्यांची भक्ति मी करू लागले, माझ्या वडिलांनी त्यांच्याकडून उपदेश घेतला होता. महाराज मला स्वतःच्या मुलीसारखे मानीत. बाहेर येऊन गादीवर बसल्यावर त्यांना सतत विडा खाण्याची सवय होती. मी दर्शनास गेले की पाच सहा विडे तरी माझ्या कडून करून घेतल्याखेरीज ते मला सोडीत नसत. माझ्या विवाहात तर पत्रिका पहाणे, स्थळ पसंत करणे, मुहूर्त, देणे घेणे ठरविणे, इतकेच नव्हे तर माझे दागिने व कपडालत्ता महाराजांनी स्वतःच्या देखरेखीखाली केला व विवाहसमयी स्वतः हजर राहिले.

आणि तसेच आपले श्रीसाईबाबा ! त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग मला आला नाही व इच्छा असूनही अद्यापही माझे शिरडीस जाणे घडलेले नाही. पण श्रीसाईसच्चरितकर्ते कै. अण्णासाहेब दाभोळकर यांच्याकडे पंक्तीला फोटोच्या रूपात बाबा जसे येऊन बसले, तसेच सुमारे ५० वर्षांपूर्वी ते आमच्या येथे आले व आजपर्यंत आमची वेडीवाकडी सेवा गोड करून घेत आहेत.

कर्जत–कुलाबा येथे कै. गोविंद सीताराम प्रभु नावाचे एक निवृत्त प्राथमिक शिक्षक होते. त्यांना प्रभुमास्तर म्हणूनच सर्व ओळखीत. ते श्रीसाईबाबांचे निस्सीम भक्त होते. श्रीबाबा त्यांना आदेश देत व त्यानुसार ते लोकांच्या अडीअडचणी निवारण करीत. श्रीबाबांच्या अनुभवाचे सतत गुणगान व श्रीसाईसच्चरित्रावर प्रवचन करणे हाच त्यांचा छंद होता.

त्यावेळी माझे बंधु कर्जत येथे शेतकी खात्यात नोकरीला होते. मी सहजच त्यांच्याकडे गेले होते. त्यावेळी श्रीबाबांनी प्रभुमास्तरना आदेश दिला की 'मला' आता येथे रहावयाचे नाही. हा माझा फोटो या गावात पाहुणी आलेल्या मुलीस नेऊन दे !' या मुलीचा शोध कसा करावयाचा असा प्रश्न प्रभुमास्तरना पडला असता श्रीबाबांनी त्यांना माझा ठावठिकाणा सांगितला त्याप्रमाणे माझ्या बंधुंच्या बिऱ्हाडी येऊन त्यांनी चौकशी केली. मी नव्याने तेथे आलेली कळताच त्यांनी आपल्याकडचा तो फोटो आणून माझ्या स्वाधीन केला, आणि श्रीबाबांची तशी आज्ञा झाल्याचे सांगितले. अशा रीतीने श्रीबाबांचे आमच्या येथे आगमन व अखंड वास्तव्य झाले.

पुढे पुण्यात मी आजारी पडले. एकदा औषध घेताच माझ्या अंगाची लाही लाहीं होऊन मी घायाळ झाले. तेवढयात माझा डोळा लागला असता मला दृश्य दिसले की एक काळा सर्प मला दंश करीत आहे व उशाला श्रीसाईबाबा व पायथ्यास श्रीमाधवनाथ असून ते त्याला निवारित आहेत, आणि तिकडे कर्जतला श्रीबाबांनी प्रभुमास्तराना झोपेतून जागे करून आदेश दिला की, "पोरगी आजारी आहे. ताबडतोब पुण्याला जा !" आणि दुसऱ्या दिवशी उजाडतच प्रभुमास्तर आमच्याकडे अचानक चौकशी करीत हजर झाले.

तुळशीचे लग्न झाले आणि माझ्या विवाहाकरता स्थळांच्या पत्रिका मागविण्यास श्रीमाधवनाथांनी माझ्या वडिलास सांगितले. त्याचवेळी कर्जतला प्रभुमास्तरना मी स्वप्नात दिसले. 'तू कोण ?' असे त्यांनी मला विचारता मी डॉक्टरीण आहे. असे मी त्यांना उत्तर दिले. त्यानुसार त्यांनी माझ्या मामाना तेही श्रीबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. डॉक्टर असलेल्या मुलाचा तपास करण्यास कळविले. माझ्या भावी पतिविषयी मामांना माहिती होतीच. ते नुकतेच डॉक्टर झाले होते. त्यांच्या मेहुण्यांच्या मदतीने मामानी पत्रिका मिळवून व सर्व परिस्थितीची खाजगी माहिती देऊन माझ्या वडिलांकडे पाठविला. माझे वडील पत्रिका घेऊन श्रीमाधवनाथांकडे जाताच पत्रिका पहाण्यापूर्वीच "माझी पत्रिका आली मी माझी मुलगी येथेच देणार" असे श्री–माधवनाथांनी निक्षून सांगितले व आमचा विवाह घडवून आणला तो पावेतो माझे

पति पूर्वी पुण्यात शिकत असता इच्छा असूनही त्यांना श्रीमाधवनाथांचे दर्शन घडले नव्हते किंवा प्रभुमास्तरांचीही ओळख नव्हती.

विवाहानंतर सासरे श्रीबाबांची व श्रीमाधवनाथांची सेवा मला कशी करता येईल. मास्तरच्या मंडळीना ते आवडेल की नाही याची काळजी मला लागली होती पण सुदैवाने सासरची मंडळी भाविक व विशेषतः श्रीसाईबाबा व श्री माधवनाथ यांच्याविषयी आदर असलेली अशीच लाभली. विवाहानंतर माझे पति पुण्यात स्थायिक झाले. श्रीमाधवनाथांनीही त्यांना आपलेसे करून घेतले आणि श्रीबाबांनीही त्यांना आपली खूण पटवून लेखनद्वारा आपली सेवा व त्यांची अध्यात्मिक उन्नति करून घेतली.

अशा रीतीने श्रीबाबांनी आपले कृपाछत्र आमच्यावर अखंड राखले आहे. आमच्या मुलांनांही श्रीबाबांविषयी अत्यंत आदर आहे.

असेच त्यांचे कृपाछत्र अखंड लाभो हीच प्रार्थना ! जय साई !

---

## बाळकृष्ण प्रधान यांचे निधन

बोरीवलीचे साईभक्त श्री. बाळकृष्ण य. प्रधान . यांना गुरुवार दिनांक २६–५–७७ रोजी पहाटे १ वाजता देवाज्ञा झाली.

रात्री १२ वाजता त्यांनी स्नान करून साईबाबांची पूजा केली व नमस्कार करून उभे होते. त्यावेळी त्यांना छातीत कळ आली व ते कोसळले. मुलाने त्यांना उचलून पलंगावर ठेवले. त्यांनी तीर्थ घेतले, अंगारा लावला व प्राण सोडला.

त्यांचे वय ६८ वर्षाचे होते. ते वेस्टर्न रेल्वेमध्ये चीफ तिकीट इन्सपेक्टर म्हणून सेवानिवृत्त झाले.

# श्रीबाबांना हवे असलेले दोन पैसे : श्रद्धा आणि सबुरी

**श्री. चकोर आजगांवकर एम्. ए.**
वाय, ११।१६९ गव्हर्नमेंट क्वार्टर्स, बांद्रा, मुं. ७१

**' गुरुपदी निष्ठा सबळ। धैर्य बळ सबूरी '** ( श्रीसाईसच्चरित )

● श्रीसाईबाबांच्या दिव्य आणि मिताक्षरी उपदेशातील **' श्रद्धा '** व **' सबुरी '** हे दोन परवलीचे शब्द होत. श्रीबाबा सूचकतेने बोलत तसेच फारच थोडे शब्द वापरीत. परंतु त्यांचा अर्थ महान् असे. मोठमोठ्या प्रवचनांच्या कवायतीनेहि तो हाती येणे कठीण असे. तथापि तो भाव किंवा भक्तीच्या हृदयाला सहजगम्य असे. श्रद्धा आणि सबुरी म्हणजे निष्ठा व धैर्य होय, प्रेम आणि तितीक्षा होय. दृढ भाव व सहिष्णुता होय. परंतु हा अगदी ठोकळेबाज अर्थ घेऊन या उपदेशाचे रहस्य हाती यावयाचे नाही. श्रीसाईसच्चरित्रकार दाभोळकर म्हणतात, **गुरुपदी निष्ठा ही ' श्रद्धा ' तर पुरुषाचे पौरुष धैर्य हीच ' सबुरी ' होय.** ' यामुळे संकटे बारा वाटांनी दूर सरतात व कृपेचा उदय होतो.' 'श्रीसाईगीतायना'त कवि म्हणतात की, **' संसारातील वांछिते असोत की साधनेतील ईप्सिते असोत, प्रत्येकाने उत्कट श्रद्धा व अखंड सबुरी या दोन अमूल्य तत्त्वांचे मोल वेचल्यावाचून अभीष्टांची कदापीही प्राप्ती होणे शक्य नाही.'**

● बाबांनी आपल्या देवदुर्लभवाणीने जे श्रद्धा सबुरीचे तत्त्व गौरविले त्याचे अर्थरहस्य कोणते याचा आपण चिंतनशील मनाने शोध घेतल्यास त्या मंथनातून सत्याचे कण बाबांच्या कृपेनेच हाती येऊ लागतात. श्रद्धा म्हणजे दृढ झालेला भाव. व्यवहारातील वाटचालीत एखादी वस्तु जशी सत्य व स्थिर मनावर ठसलेली असावी, कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे अस्तित्व जसे सत्य व भावविश्वात स्पष्ट स्थिरावलेले असावे तसेच गुरु वा परमेश्वराचे अस्तित्व त्याच्या सान्निध्याचा भाव अथवा त्यांच्या कृपाशीलतेवरील निष्ठा आपल्या साऱ्या अस्तित्वात, प्राण मन देह बुद्धी अहंकारात स्थिर झाले पाहिजे. असा भाव ज्यावेळी स्थिर होईल, तेव्हाच खरी श्रद्धा जन्माला येईल. केवळ अडचणीपुरते प्रभूचे स्मरण करणे त्याचा ठसा हृद-

यावर न विश्वसता केवळ व्यावहारिक सौदेबाजी करणे म्हणजे श्रद्धा नव्हे. श्रीबाबांनी अपेक्षिलेली श्रद्धाही संपूर्ण समर्पण शरणागतवृत्ति आहे, अनन्यशरणभाव आहे. मग तो नवविधा भक्तीच्या कोणत्याही एका कलेत व्यक्त झाला तरी चालेल. तो सख्यभाव असेल, दास्यभाव असेल, तो कोणताहि जिव्हाळ्याचा भाव असू शकेल पण तो दृढमूल झालेला, अंतरात पूर्णपणे स्थिरावलेला, खोलवर रुजलेला, अंतर्बाह्य विनटलेला शुद्ध बावनकशी भाव हवा. श्रीबाबांनी श्रद्धाभावाला पैसा म्हटले याचे कारण द्रव्यावर जशी माणसाची तीव्र आसक्ती असते तशी तीव्र प्रेमासक्ति श्रीगुरुवर वा परमेश्वरावर हवी. एकादा सुवर्णालंकार हरवला की जसे अस्वस्थ वाटावे, तसेच प्रभुस्मरणावाचून अस्वस्थ वाटले पाहिजे. व्यवहारातील प्रियवस्तूत वाटला गेलेला आत्मीयतेचा भाव परत एकीकृत करून तो गुरु व देवावर केंद्रित केला पाहिजे. असे करता करता प्रभूवर गुरुवर अनुरक्ति व व्यावहारिक प्रिय गोष्टीबद्दल विरक्ति हळूहळू बाणते व मन निर्वासन होते.

● श्रीबाबांनी पुरस्कारिलेली श्रद्धा आपल्या सोनपाडला मागून प्रेम घेऊन येते, भक्तीची बैठक तयार करते आणि निष्ठेचा महाल बांधते. श्रद्धेच्या प्रगत पायऱ्या अनन्यभक्तीच्या मंदिराकडे नेतात व समर्पण शरणागतीच्या गाभाऱ्यापर्यंत पोहचवितात. ही आंतरीक उत्क्रांति होत असता बाहेरील व्यावहारिक जीवनातहि फेरबदल होतात. जाणीवपूर्वक ते करावे लागतात. व्यवहारातील प्रसंग, छायाप्रकाश, हारजीत म्हणजे एक अनुभवाची शाळाच! कर्मानुसार घडविलेल्या प्रारब्धातून जीवनातील घटना घडतात. अशावेळी आतील श्रद्धा भक्तीमय उत्क्रांतीला बाहेरील सहिष्णुतेचे व विरक्तीचे वातावरण सहाय्य करते. जीवनातील कोणत्याहि बऱ्यावाईट प्रसंगाला स्थिर, द्वंद्वातीत, धैर्यशील वृत्तीने तोंड द्यावयास साधकाने शिकावे लागते. येणारा प्रत्येक प्रसंग, मनात उठणारी प्रत्येक प्रतिक्रिया व कृतीत रूपांतरित होणारी प्रेरणा वा वृत्ति त्याने आवरावी लागते. परमेश्वराकडे सूर्यफुलाप्रमाणे अभिमुख झालेल्या जाणीवीत विलीन करावी लागते. हे मनप्राण बुद्धी अहंकाराचे वृत्तिसमर्पण होय. याला सबुरी वा धैर्याची बैठक लागते. आत्यंतिक सहिष्णुता, तितीक्षा असल्याशिवाय प्रारब्धाच्या योगात अविचल रहाण्याची किमया मानवाला साधणे कठीण. म्हणून सबुरीच्या उपदेश करताना या अखंड तैलधारावत् अनन्यशरण सहनशीलवृत्तीवर बाबा भर देतात. प्रभूच्या नामरुपस्मरणात गुंतलेल्या मनाने जीवनातील सुखदुःखाच्या कसोटीच्या प्रसंगातून जाताना सबुरीने वागले पाहिजे. यामुळे भोग सौम्य होतात. आत्मिक बळ वाढते. कृपेचा प्रवाह खाली येतो. साधकाला दुस्तर अशा प्रारब्धाला ओलांडावयास मदत करतो. प्रारब्धाच्या भोगात श्रद्धा व सबुरीच्या आधाराने वाट

काढल्यास (त्या प्रतिकूलतेचा) **"हरिकृपे त्याचा नाश आहे."** या शब्दात संतानी निर्वाळा देऊन ठेवला आहे. एकूण सबुरीमुळे प्रारब्ध संचिताचा नाश करणे व श्रद्धेने नव्या जीवनाची निर्मिती करणे ही दुहेरी साधना माणसाला भवसागराच्या पार नेते. श्रद्धेत नामस्मरण, नवविधाभक्ती, समर्पणवृत्ती इत्यादी गोष्टींचा समावेश होतो तर सबुरीमध्ये तितीक्षा, तपाचार, वैराग्य, सदाचार, सहना इत्यादी साधनांचा समावेश होतो. श्रद्धा ही मानसिक तर सबुरी ही शरीर व मन या दोहोंना व्यापणारी! श्रद्धा व सबुरी ह्या औषधानी मानवी जीविताचे बिघडलेले आरोग्य सुधारून त्याच्या देह मनाला नवजीवन देण्याचे सामर्थ्य आहे. बाबांनी जगाला दिलेली ही अमृतवल्लरी आहे. अमृत संजीवनी आहे.

**॥ निष्ठेसवे सबुरी — प्रेमासवे प्रणाम**
**श्रद्धेसवे तितीक्षा — मज प्यार दोन दाम** (श्रीसाईगीतायन)

---

## श्री. दत्तकुमार कळसकर साईचरणी विलीन

मुलुंड येथील वयोवृद्ध साईभक्त श्री. दत्तकुमार लक्ष्मण कळसकर हे वयाच्या ५९ व्या वर्षी आपल्या राहात्या निवासस्थानी दि. ११-६-७७ रोजी रात्री ८-३० वा. श्रीसाईचरणी विलीन झाले. दि. १-३-७६ रोजी बाँबे टेलिफोन्समधून डिव्हीजनल इंजिनियर या जबाबदारीच्या पदावरून ते सेवानिवृत्त झाले होते. ते साईबाबांचे निष्ठावान भक्त होते. श्रीसाईलीलेचा दरमहा घरी येणारा अंक पोस्टमनने टाकू नये तर तो बेल वाजवून आपल्या हाती द्यावा अशी विनंती त्यांनी पोस्टमनला केली होती. श्रीसाईलीला आपल्याकडे येते म्हणजे श्रीबाबाच प्रत्यक्ष आपल्या घरी येतात अशी त्यांची श्रद्धा होती. कळसकर यांच्या मागे त्यांच्या वयोवृद्ध मातोश्री, भगिनी व पत्नी-श्रीमती मंदाकिनी इ. मंडळी आहेत. आम्ही त्यांच्या कुटुंबियांचे दुःखात सहभागी आहोत. परमेश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

## चुकीची दुरुस्ती

श्रीसाईलीला मे ७७ अंकात पान ४१ वर मेरा भी नाम लिखना ही श्री. जयवंत कुलकर्णी यांची कविता प्रसिद्ध झाली आहे या कवितेत ओळ बारावी हर **रोज** दूर होते है...अशी आहे. त्याऐवजी हर **रंज** दूर होते हैं...असे वाचावे.

# साईभक्त जेव्हा अचानक भेटतात....

● सौ. उषाताई प्र. मुळे
साईनाथ माध्यमिक विद्यालय,
मु. पो. शिर्डी, ता. कोपरगाव

● पावसाळ्याचे दिवस होते. पाऊस कोसळत होता. संगमनेरची जनता निद्रेच्या पूर्ण आधीन झाली होती. रस्त्यावर तुरळक रहदारी होती. ती पण नावालाच. बाकी सर्वत्र शुकशुकाट होता. शिर्डीहून गाडी यायला उशीरच झाला होता. त्यात हा पाऊस. टांगा दारापुढे थांबला. मी बघितलं अन् छातीत धस्स झालं. दाराला असलेल्या भल्या मोठ्या कुलपानेच माझं स्वागत केलं. चूक माझीच होती. पत्र न पाठवता यायची सवय मला चांगलीच भोवली होती. टांगेवाला मला उतरविण्याविषयी विचारत होता परंतु मी कोठे जाणार होते ?

त्याच टांग्याने परत स्टँडवर आले. कपडे भिजून चिंब झाले होते. तशाच स्थितीत बसून राहिले. सकाळपर्यंत तिथेच बसण्यावाचून पर्याय नव्हता.

"आत्या तू इकडे कोठे ?" परिचित आवाज कानावर पडला. एवढ्यात मी चमकून बघितलं. आश्चर्याला पारावार राहिला नाही. गुरुपौर्णिमेनंतर तो आज मला भेटला होता. तो देखील अनपेक्षितपणे अशा स्थितीत. मन भरून आलं. स्टँडवर इतक्या रात्री तो कशाला आला होता ! बाबांच्या दर्शनाला नेमाने येणारा तो साईभक्त होता. माझ्या मनातील आंतरिक इच्छेचे तरंग त्याच्या मनात कसे उमटले होते ? कोणत्या प्रेरणेने तो माझ्या संकटाच्या वेळेस धावून आला होता. ही तर बाबांची कृपा होती. संकटात सापडलेल्या भक्ताला मदत करण्यासाठी बाबा असे नेहमीच धावून येतात.

..............

एक प्रवास वर्णन :

# पाऊले चालली शिरडीची वाट

● श्री. मनुभाई शाह
राममंदीर समोर, नवापूर जि. धुळे

● सात–आठ वर्षापूर्वी शिर्डीला पायी चालत जाऊन बाबांचे दर्शन घ्यायचे असा नवस केला होता; परंतु हा नवस पूर्ण करण्याचा योग जुळून येत नव्हता. नवापूर ते शिर्डी २२५ कि. मी. चा प्रवास एकट्याने करण्याची हिंमत होत नव्हती. तरीही जबरदस्त इच्छा मनात होतीच. अनेक कारणांनी अडचण निर्माण होऊन प्रवास लांबणीवर पडत होता. ही अडचणसुद्धा स्वतः बाबांनीच दूर केली.

माझे एक मित्र श्री. हसमुख पाटील जे हायस्कूला शिक्षक असून साईबाबांचे निस्सिम भक्त आहेत. त्यांना मी माझा मनोदय व्यक्त केला. त्यांना शाळेला सुट्या असल्यामुळे माझ्याबरोबर शिर्डीला पायी प्रवासाला निघण्याची विनंती केली. ते काहीतरी अडचणीत असल्यामुळे अळंटळं करीत होते.

योगायोगाने या काळात एक अद्भुत घटनेचा त्यांना प्रत्यय आला. घटना अशी घडली की, एके दिवशी एस. टी. प्रवासात त्यांची बॅग हरवली जिच्यात सोन्याचे दागिने व इतर किमती वस्तू होत्या. घरी आल्यावर त्यांना बॅगेची आठवण झाली. ताबडतोब त्यांनी बाबांचा धावा केला व प्रार्थना केली की, जर माझी बॅग मला परत मिळाली तर मी श्री. मनुभाई शाह यांचेबरोबर पायी चालत शिर्डीला येईन. बाबांच्या कृपेने बॅग सापडली. म्हणून आम्ही दोघांनी ता. १४।५।७७ च्या दिवशी निघायचे नक्की केले. ता. १६।५।७७ सोमवारी नवापूरहून प्रवासाला सुरुवात करायची; परंतु बाबांची इच्छा वेगळीच होती. अजून त्यांच्या एका भक्ताला बोलावण्याचा विचार होता.

श्री. बेचरभाई पटेल जे बऱ्याच वर्षापासून साईबाबांचे भक्त आहेत. नवापूरात त्यांचा तंबाखूचा धंदा आहे. आमच्याबरोबर यायची त्यांना मनापासून इच्छा होती. परंतु मंगळवारी बाहेरगावाहून तंबाखूचा ट्रक यावयाचा असल्याने ते येऊ शकत नव्हते. रविवारी रात्री मीसुद्धा फ्लु ने आजारी झाल्यामुळे साहजिकच आमचा

प्रवास दोन दिवस पुढे ढकलावा लागला. मग गुरुवारी दि. १९।५।७७ रोजी प्रवासास निघण्याचे निश्चित केले. आणि म्हणूनच श्री. बेचरभाई पटेल सुद्धा आमच्याबरोबर येऊ शकले. आदल्या दिवशी बुधवार ता. १८।५।७७ ला माझ्या घरी एकत्र जमलो व खालीलप्रमाणे प्रवासाचा कार्यक्रम निश्चित केला.

१) प्रत्येकाने आपल्याबरोबर कमीत कमी सामान म्हणून सतरंजी, चादर, रुमाल व तांब्या घ्यावा.

२) गुरुवारी प्रवासास सुरुवात करून पुढील गुरुवारी शिरडीला पोहचावे या दृष्टीने रोज कमीत कमी ३० कि. मी. प्रवास करणे.

३) तब्येत बिघडू नये म्हणून जेवणावर विशेष लक्ष द्यावे.

४) चालत असताना एकमेकाशी न बोलता मनातल्या मनात साईनामाचा जप करणे.

गुरुवार ता. १९।५।७७ च्या दिवशी प्रवास निर्विघ्न पार पडावा म्हणून बाबांना प्रार्थना केली. वडील माणसांना नमस्कार करून सकाळी साडेसहा वाजता प्रवासास सुरुवात केली. दुपारचे जेवण गंगापूरला एका मित्राकडे घेऊन रात्री सोनखांब आश्रमशाळेत मुक्काम केला. (नवापूर–सोनखांब २६ कि. मी.)

शुक्रवार ता. २०–५–७७ ला सकाळी साडेपाचला सोनखांबहून चालण्यास सुरुवात केली. तीन तास सतत चालल्यानंतर एक चमत्कार प्रत्ययास आला. कोंडाईबारी घाट जवळ जवळ पार केला. तेथे एक साधु धुनी लावून बसला होता. पाणी पिण्याच्या निमित्ताने आम्ही त्यांच्यापाशी गेलो. त्यांनी थंडगार पाणी पिण्यास दिले. पाणी पीत असताना साधुमहाराज म्हणाले,

"साईनाथको जा रहे हैं क्या?"
आश्चर्याने थक्क होऊन आम्ही म्हणालो, "होय महाराज!"
"शिर्डीहून परतताना एस. टी. ने. याल ना?"

खरोखर महाराज आम्हाला जास्तीत जास्त आश्चर्यचकीत करीत होते. शेवटी माझ्याने राहवले नाही. मी विचारले, 'महाराज, आपको कैसे मालूम हुआ, हम बाबाके दर्शनके लिये जा रहे हैं!"

यावर महाराज स्मितहास्य करीत म्हणाले, "कुछ भी बोल लेता हूं! ईश्वरकी दयासे कभी कभी सच हो जाता है। शिरडीसे हमारे लिये नरीयल लेके आना।"

(परत येताना हसमुखभाईनी आठवणीने नारळ घेतले होतेच) सायंकाळी सात वाजता सामोड्याला मुक्काम केला. (सोनखांब-सामोडा ३० कि. मी) शनिवार ता. २१–५–७७ च्या दिवशी सकाळी सहा वाजता सामोड्याहून निघून रात्री ताहराबादला मुक्काम केला. (सामोडा–ताहराबाद २६ कि. मी.) रविवारी सकाळी ताहराबादहून निघालो. दुपारी सटाण्यास पोहोचलो. टपाल वगैरेचे काम असल्याने रात्रीचा मुक्काम सटाण्यासच केला. (ताहराबाद–सटाणा २४ कि. मी.)

सोमवार २३–५–७७ सकाळी साडेपाच वाजता सटाण्याहून प्रवासास सुरुवात केली; आणि सबंध दिवस चालून रात्री चांदवडच्या ऐतिहासिक वाडा ' रंगमहाल ' येथे मुक्काम केला. हा रंगमहाल राणी अहिल्याबाई होळकरानी बांधला आहे. वाडा फारच भव्य आहे. चारशे वर्षांपूर्वी बांधलेला हा वाडा अजुनही मजबूत आहे. (सटाणा–चांदवड ३२ कि. मी.)

मंगळवार ता. २४–५–७७ सकाळी साडेपाच वाजता चांदवडहून निघून दुपारी १२ वाजता मनमाडला पोहचलो. तेथून दुपारी चार वाजता प्रवासास सुरुवात करून रात्री ८ वाजता अनकाई रेल्वे स्थानकावर मुक्काम केला. बाबांच्या कृपेने प्रत्येक ठिकाणी आमची चांगली व्यवस्था राहायची (चांदवड–अनकाई ३६ कि. मी.) बुधवार ता. २५–३–७७ सकाळी ६ वाजता अनकाईहून निघालो तो ९ वाजता येवल्यास पोहोचलो. तेथे दुपारी विश्रांती घेऊन दुपारी २ वाजता निघालो. संध्याकाळी ७ वाजता कोपरगावला पोहोचून रात्री कोपरगावलाच मुक्काम केला. (अनकाई–कोपरगाव ३२ कि. मी.) गुरुवार ता. २६–५–७७ ला कोपरगावहून शिरडीस निघालो. आता फक्त १३ कि. मी. चा प्रवास होता म्हणून घाई नव्हती. सकाळी साडेसहा वाजता प्रवासास सुरुवात केली.

बाबांच्या दर्शनासाठी मन फारच आतूर होते. जसजसे शिर्डीच्या जवळ पोहोचत होतो तसतसे शिरडी दूर दूर वाटत होती. शेवटी लक्ष्मीवाडी टाकून पुढे गेल्यावर समाधीमंदिराचा कळस अस्पष्ट दिसावयास लागला. जसजसे जवळ पोहचत होतो तसतशी आतुरता वाढावयास लागली. शेवटी शिरडीला पोहोचलो.

गुरुपादुकास्थळी दर्शन करून समाधीमंदिरात गेलो. बाबांनी स्वागतपर दृष्टीला दृष्टी भिडवली. बाबांच्या हसऱ्या चेहऱ्याचे दर्शन झाले. परदेशाहून लांबचा प्रवास आटोपून मुलगा सुखरूप परत आल्याचा जसा आनंद वडिलांना होतो त्याच्याहून अधिक आनंद बाबांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मंदिरात पाय ठेवताच

बाबांचे शब्द माझ्या कानी आले. "आलास बेटा! ये!! रस्त्यात काही त्रास वगैरे झाला नाही ना?"

"साईनाथ! ज्याच्या मस्तकावर तुमचे छत्र असल्यावर कसला आला त्रास? बाबा, जसं आहे तसंच प्रेम आणि छत्र अखंड जन्मोजन्मी या बालकांवर ठेवा. -या उपरांत माझे काहीच मागणे नाही. आमचा प्रवास सफल झाला तो तुझ्या कृपेनेच आणि तुझे दर्शन करून माझा जन्मच सफल झाला. मागील जन्मी माझ्या हातून चुकून काही सत्कर्म घडले असेल म्हणूनच या कारणाने या जन्मी तुझ्या चरणाशी मला स्थान मिळू शकले."

'बाबा–बाबा–साईबाबा!'

..............

## श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात श्रीअवधूतस्वामीमहाराज लिमये यांनी प्रगट केलेले काही उद्‌बोधक विचार

● मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता अधिकारी सद्‌गुरूला शरण जाऊन त्यांची प्रेम पूर्वक सेवाभक्ती करून आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यातच आहे. इतर पशुपक्ष्यादि योनी ह्या भोगयोनी आहेत, परंतु मनुष्ययोनी हीच एक ज्ञानयोनी आहे. मग मनुष्य-जन्माला येऊन ज्ञान प्राप्त करून घ्यायचे नाही तर कुठल्या जन्मात? स्वतःच्या देहाचा मोह, आप्तस्वकीयांचा मोह व जगाचा मोह अशा त्रिविध मोहपाशात मनुष्य अडकलेला आहे. जगाचा मोह म्हणजे जगातील विषयांचा मोह, व्यक्ती व परि-स्थितीचा मोह. ह्या मोहांमुळेसुद्धा परमार्थबुद्धी स्थिर राहात नाही. आप्तस्वकीयांचा मोह तर जबरदस्तच असतो. निकटवर्ती आप्त म्हणजे पती, पत्नी, मुले व आईबाप यांपैकी कोणाच्या ना कोणाच्या मोहात किंवा सर्वांच्या मोहात मनुष्य सापडतो आणि मनुष्यजन्माचे जे उचित कर्तव्य म्हणजे परमेश्वरभक्ती करणे ते विसरतो. याखेरीजच्या

आप्तस्वकीयांचा किंवा इष्टमित्रांचा मोहही काही कमी नसतो. त्याला या मोहांपायी परमेश्वराचा विचार करायला अवसर आहे कुठे ? सर्वांत मोठा मोह म्हणजे स्वतःच्या देहाचा. ह्या देहाच्या मोहांमुळेच मनुष्य अनेकानेक वासनांना, प्रलोभनांना बळी पडतो. कामक्रोधादि विकारांचा दास बनतो. ह्या देहाला जरा कुठे व्याधी झाली की जीवाची काय अवस्था होते. देह मी हीच भावना बळकट असल्यामुळे तो रोग-व्याधींनी किंवा संकटादिकांनी अतिशय पीडा पावतो. ही देहबुद्धी झडली पाहिजे. देह मी नव्हे आत्मा मी हे ज्ञान झाले पाहिजे. देहाचे दुखणे हे माझे नव्हे. मन मी नव्हे, बुद्धी मी नव्हे, तर आत्मा मी हाच सरतेशेवटी अनुभव आला पाहिजे. पण हे तर ज्ञानाशिवाय घडणे नाही. म्हणूनच सद्‌गुरूला अनन्यभावे शरण जाऊन त्यांच्या-कडून आत्मज्ञानाचे पाठ आत्मसात् केले पाहिजेत.

शरण आलेल्या आपल्या शिष्याचा अधिकार पाहून सद्‌गुरु त्याला कार्य लावून देतात. आपली ही जबाबदारी सच्छिष्याने ओळखली पाहिजे. "स तरति स तरति यः लोकांस्तारयति ।" सच्छिष्य हा स्वतः तरून मोक्षपदाला, सद्‌गुरुपदाला प्राप्त होतो. पण एकटा नव्हे. तो आपल्याबरोबर इतरांनाही तारून नेतो. आपण तरलो हे नव्हे नवल—आपला उद्धार झाला, आपल्याला ज्ञान प्राप्त झाले एवढयाने भागत नाही. अज्ञानी जनांचा उद्धार करण्याचे कर्तव्य राहतेच म्हणून सच्छिष्याने लोकोद्धार-कार्यासाठी स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. सद्‌गुरु त्याला प्रेमभक्तिज्ञान यांच्या योगाने धष्टपुष्ट करतात. हेतु हा की त्याने इतरांनाही ते द्यावे. कारण, ही भक्ति-मार्गाची गुरुशिष्यपरंपरा आहे व ती सद्‌गुरु व सच्छिष्य अशीच चालू राहते. सच्छिष्यच आत्मज्ञान झाल्यानंतर सद्‌गुरुपदाचा अधिकारी होतो व ह्या मायेत कार्य करायला पूर्ण समर्थ ठरतो. सद्‌गुरूंनी कार्य लावून दिल्यावर नको नको म्हणणे किंवा पळपुटेपणा पत्करणे अथवा अंगचोरपणा करणे ही भ्याडाची लक्षणे आहेत. सद्‌गुरूंची आज्ञा नाही पाळायची तर कोणाची ? सद्‌गुरु म्हणजे साक्षात् परमे-श्वर. ते अयोग्य कसे सांगतील ? त्यांच्या कार्यात तर आपण स्वतः सहभागी व्हायचेच. पण ते आज्ञा करतील तेव्हा स्वतः कार्य करायची तयारी पाहिजे. त्यांचे कृपाबळ पाठीशी असताना भिवून जायचे काहीच कारण नाही.

भगवान श्रीकृष्णानी अर्जुनाला ऐन युद्धप्रसंगी कौरव–पांडवांच्या दोन सैन्यामध्ये गीता–बोध केला. कौरवांना वाटले असावे–श्रीकृष्ण व अर्जुन युद्धासाठी व्यूह कसा रचावा ह्याचा खल करीत असावेत, त्यांनी व्यूह रचला की भीष्मद्रोणांच्या सल्ल्याने आपणही तोडीस तोड असा व्यूह रचू. कृष्णार्जुनांचे काय चालले आहे याची खुद्द पांडवानांच जिथे कल्पना नव्हती तिथे ती कौरवांनाच कुठून येणार ?

स्वधर्मकर्माचा त्याग करून रानात जावयास निघालेल्या व श्रीकृष्णालाच ज्ञानाच्या गोष्टी सांगणाऱ्या मोहग्रस्त अर्जुनाला श्रीकृष्णानी चांगले चमकावले–क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतद् त्वय्युपपद्यते ।' पार्था, तू षंढ आहेस काय ? युद्धातून माघार घेणे तुला शोभते काय ? श्रीकृष्णानी चांगले फैलावर घेतल्यावर शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् 'म्हणून अर्जुन अनन्य भावाने श्रीकृष्णाला शरण गेला. तेव्हा श्रीकृष्ण-मुखातून गीताबोध प्रसवला. तसेच, हा गीताबोध महर्षी व्यासांच्या कृपेने त्यांचा सच्छिष्य संजय ह्याने ऐकला व व्यासांच्या आज्ञेवरून संजयाने तो धृतराष्ट्राला ऐकवला. धृतराष्ट्र हा व्यासांचा पुत्र, पण आपल्या दुर्योधनादि शंभर पुत्रांच्या मोहाने आंधळा झालेला. त्याला हा बोध पहिल्यांदा पटला नाही. पण सर्व कौरवांचा नाश होऊन बंधू विदुराच्या सांगण्यावरून गांधारीसह तो जेव्हा वनात निघून जातो त्यावेळी त्याला हा गीताबोध आठवतो तो मुक्त होतो. सद्गुरूंची कृपा व बोध हा केव्हाही अनाठायी ठरत नाही हे लक्षात ठेवा. आयुष्यात कधी ना कधी तरी त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही.

पार्थाचे ध्वजचिन्ह कपी होते. तो साक्षात् मारुतीच होता. त्यालाही हा गीताबोध प्राप्त झाला. गीता सांगत असताना प्रत्येक वेळी हुंकार कोण देत आहे असे आढळल्यावरून श्रीकृष्णानी बारकाईने कानोसा घेतला. तेव्हा समजले की तो मारुतीच होता–रामावतारातील आपलाच परमभक्त. त्यालाही हा गीताबोध ऐकण्याचे महद्भाग्य लाभले. त्याचे काम युद्धसमयी भुभुःकार करून कौरवांना भिववून सोडायचे हेच होते. भगवानांनी गीताबोध सांगितल्यानंतर अर्जुनाकडून प्रत्यक्ष युद्ध करवून घेतले व अर्जुनही पूर्ण कसोटीला उतरला. सर्व कौरवांचा पाडाव झाला व पांडव विजयी झाले. जेथे योगेश्वर कृष्ण तिथेच विजय हे ठरलेले आहे. पांडव हे श्रीकृष्णभक्त होते म्हणून त्यांचा विजय झाला. हे जर सत्य आहे तर परमेश्वरस्वरूप सद्गुरु पाठीराखा असताना सच्छिष्याला पराक्रम करताना ह्या जगात काय कमी पडेल ? 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन' ॥ हे युद्ध आपल्याच कामक्रोधादि षडविकारांच्या बरोबर चालवायचे आहे व ते देखील मनानेच. म्हणूनच सद्गुरु बोधाने मन कलिकाळाशी टक्कर द्यायला पूर्ण तयार केले पाहिजे. हबकून जाऊन किंवा गांगरून जाऊन चालायचे नाही. सद्गुरु-देखील देहधारी आहेत. देहाने कोणीही चिरंजीव नाही. त्यांचा आत्मबोध हाच उपयोगाला येईल याची मनोमन तयारी ठेवली पाहिजे.

भगवान श्रीकृष्णानी नाना तऱ्हेने अवतारकार्य केल्यानंतर पुढे निर्याणकाळ जवळ येऊन ठेपला. भगवान त्यावेळी द्वारकेबाहेरील अश्वत्थ वृक्षाचा आश्रय

करून ध्यानस्थ पहुडले होते. तोच जराव्याधाने बाण मारला. तो त्यांच्या आरक्त-चरणात घुसला. आजपर्यंत जरासंधाने सतरा वेळा मथुरेवर स्वारी केली होती ती भगवंताने आपल्या सामर्थ्याने परतवून लावली होती. परंतु सगुण देहधारी भगवंताच्या कार्याला काळाची मर्यादा आहे. शेवटी वयाला सव्वाशे वर्षे झाली असताना जरा व व्याधी (जराव्याध) यांचे देहावर आक्रमण झाले. सतरा वेळा जरेने संधी (जरासंध) साधून आक्रमण केले होते पण ते भगवंतानी आपल्या आत्मबलाने परतवून लावले होते. निर्याणकाळी श्रीकृष्णाजवळ कोणी नाही. एकटा उद्धव तेवढा भगवंताचा शोध घेत धावत आला. ज्या यादवांना श्रीकृष्णाने आपल्या पराक्रमाने ऐश्वर्य प्राप्त करून दिले व सर्वतोपरी रक्षण दिले, तेच यादव शेवटी उन्मत्त बनले श्रीकृष्णाचे माहात्म्य विसरले व त्याच्यावरच उलटले. शेवटी आपापसात यादवी माजवून त्यानी स्वतःचा नाश ओढवून घेतला. यादव त्यांच्या कर्मानेच नाशाप्रत गेले. उद्धवाला मात्र तो शरण आला असता भागवत ज्ञानाचा बोध केला. तसेच मैत्रेय-ऋषीना बोध केला व त्यांच्याकडून तो बोध परमप्रिय भक्त विदुर त्याला द्यावयास सांगितला. भगवान वैकुंठाला जावयास निघाले तेव्हा तो निर्याण प्रसंग पाहावयास आलेल्या देवांनी विनंती केली—'भगवान, वैकुंठाला जाताना आमच्या स्वर्गादि लोकांना भेट देऊन मगच तुम्ही जावे.' भगवान केवळ हसले. देवाना वाटले वैकुंठ म्हणून काही स्थान आहे. कारण, त्यांना भगवंताच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञानच नव्हते, आणि एकनाथमहाराज वर्णन करतात की वीज चमकावी तसा भगवंताने आपला अवतार केव्हा संपवला हे कोणाला कळलेसुद्धा नाही. देव अचंबा करीत राहिले. वैकुंठ दुसरे कुठे आहे ? ह्याच देहात. तुकाराम महाराज वैकुंठाला गेले म्हणजे कोण्या वैकुंठ नावाच्या स्थानाला गेले नाहीत. ह्याच देहात त्यांना भगवत्स्वरूपाचे ज्ञान झाले व ते निर्याणाच्या वेळी त्यात विलीन झाले. संसारात वैफल्य प्राप्त होऊन जीव भगवंताला अनन्यभावे शरण जातो व त्याचे ते वैफल्य भगवत्स्वरूपाच्या ज्ञानाने समूळ कुंठित होते, नाश पावते—तेच वैकुंठ. हे ज्ञान सद्गुरुशिवाय कोण सांगणार !

उत्तम भाषण, प्रवचन किंवा कीर्तन करता येणे हे आपल्याला अध्यात्ममार्गात अधिकार प्राप्त झाला याचे लक्षण नव्हे. पूर्वकाळीसुद्धा असे शब्दपंडित कितीतरी होऊन गेले. त्यांनी वादविवाद करण्यातच धन्यता मानली. आताही असे मुखाने ब्रह्मज्ञान बोलणारे कमी सापडावयाचे नाहीत. ज्ञानी तोच की जो पूर्ण वैराग्यशील आहे, पूर्ण वासनामुक्त झालेला आहे. तो उत्तम भाषण करू शकेलच असे नाही. पण भगवंताच्या प्रेमाने मात्र तो न्हाऊन निघालेला असेल. त्याच्या वाणीतून ते प्रेम

भरभरून वाहत असलेले दिसेल व तो आपल्या सहवासाने इतरांनाही भगवंताच्या भक्तीचे वेड लावील. थट्टा विनोद करणे, उत्तमोत्तम गोष्टी सांगणें व श्रोत्यांचे रंजन करणे हा काही परमार्थ नव्हे. नटसुद्धा थट्टा विनोद करून प्रेक्षकांना हसवतात. फार तर त्यांना विदूषक म्हणता येईल, ज्ञानी नव्हे! संसारात पूर्ण अनासक्ती प्राप्त होऊन आत्मज्ञान झाल्याशिवाय कृतकृत्यता नाही.

स्त्रियांना भक्तिमार्गात घ्यावे किंवा नाही ह्याबाबत पूर्वाचार्यांपासून दंडक घालून ठेवलेले आहेत. कारण, अनधिकारी लोक त्याचा गैरफायदा करून घेण्याची शक्यता असते. आम्ही स्त्रियांच्या एकंदर जीवनाचा बारकाईने अभ्यास केला व जाणले की, स्त्रियांना ह्या जीवनात अतिशय दुःख आहे. त्यांनासुद्धा आपले दुःख कोणाजवळ तरी व्यक्त करायचे व मनःशांती प्राप्त करून घ्यायचा जरूर हक्क आहे. ही व्यक्ती कोणीतरी असून चालणार नाही. तर अधिकारी व्यक्तीच पाहिजे. मनुष्यमात्राला मोक्षाचा अधिकार आहे. मग तो केवळ पुरुषालाच नव्हे, स्त्रीलासुद्धा आहे. आम्ही तळमळीने शरण आलेल्या स्त्रियांना भक्तिमार्गात घेतले. पण दोघाही पतिपत्नींना जोडीने मिळून. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता मावळली. तसेच, एखादी स्त्रीच मार्गात येऊ इच्छीत असेल तर तिच्या निकटच्या आप्तस्वकीयांची परवानगी घेऊनच तिला मार्गात येऊ दिले. ह्यामुळे मार्गाची शुद्धता राहते. स्त्रियांचा उद्धार करणे ही सोपी गोष्ट नाही. लोकापवादांनाही तोंड द्यावे लागते. ज्याची धमक असेल तोच महात्मा हे करू जाणे. इतरांनी त्या भानगडीत पडू नये. जो पूर्ण वासनानिर्मुक्त झाला आहे अशालाच हा अधिकार परंपरेने दिला आहे. अनधिकारी साधक जर हे धाडस करू पाहतील तर त्यात लोकोद्धार करता करता आत्मनाशच प्राप्त करून घेतील. म्हणूनच बुवाबाजीसारखे प्रकार ह्या कलियुगात चाललेले आढळतात. काही काळ प्रसिद्धी मिळते. पण पुढे कोणी विचारत नाहीत अशी त्यांची स्थिती होते.

म्हणूनच सद्‌गुरु ह्या कलियुगाची सर्व परिस्थिती जाणून आपल्या शिष्य-भक्तांना सावधानतेचा इशारा देतात—'पोरा सावध रे सावध रे स्वरुपी जागे जागे। दूरवरी पाही गड्या ओढील हा रागे रागे ॥'

..............

# अचानक आलेल्या संकटातून बाबा आपल्या भक्तास संभाळतात

स. स. देशपांडे
रामदास कॉलनी, ११ जिल्हापेठ जळगाव.

* मंगळवार दि. ७–६–७७ सकाळी ५ वा. झोपेतून उठलो. नित्याचे सर्व विधी, पोथीवाचन संपवून ६ वा. ची थेट जळगाव ते यावल एसटी बस मिळावी म्हणून घाई गर्दीने बसस्थानकावर पोहोचलो. नेहमीच्या सवयीप्रमाणे रस्त्याने चालताना श्रीगुरुदत्ताचे व श्रीसाईचे नामस्मरण चालू होते. अगदी बस सुटता सुटता मिळाली. मनाला समाधान वाटले. जळगाव-भुसावळ-यावल असा बसचा मार्ग होता त्याप्रमाणे भुसावळ रस्त्याने बस धावू लागली. खिडकीजवळच जागा मिळाल्याने मन गार हवेने प्रसन्न होते. तोंडाने नामस्मरण चालू होते. जळगाव ते भुसावळ साधारण १८।२० कि. मी. अंतर वाटेत रेल्वे फाटक लागले ते बंद असल्याने थोडा खोळंबा झाला परंतु नामस्मरणाचे तंद्रीत खोळंब्याचे काही विशेष वाटलेच नाही. रेल्वे फाटक उघडले, परत प्रवास सुरू झाला. भुसावळ शहर १ मैलाचे अंतरावर दिसू लागले अशा सर्व परिस्थितीमध्ये भरधाव पळणारे बसचे मागचे एक चाक एकाएकी फुटले. खूप मोठा आवाज झाला. त्या आवाजाने सर्व प्रवासी हादरले. तेवढयात ड्रायव्हरचा बसवरील ताबा सुटू लागला. वेळ सकाळी ७ वा. च्या सुमारास बस रस्त्यावर इकडून तिकडे वाकडी तिकडी धावू लागली. सुदैवाने रस्त्यावर वाहन अगर सायकल, अथवा पायी प्रवासी कोणी नव्हते. तेवढयात ड्रायव्हरने खूप प्रयत्न करून बस आटोक्यात आणली व थांबवली. सर्वांची मने भितीग्रस्त झाली होती सर्वांनी श्वास सोडला व देवाचे आभार मानले.

याच बसवर निकडीसाठी हवा भरून तयार असे एक चाक होते. सर्व प्रवासी हळुहळू बस खाली उतरले. तेवढयात एक उत्साही (बसमधील) तरुण पोर्टरवर चढला व त्याने कोणासही काहीही सूचना न करिता वरून ते हवा भरलेले मोठे चाक रोडवर टाकले. त्याच्या या अविचारी वागण्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. ते चाक रोडवर पडताच वर उधळले व कोणाच्याही लक्षात येण्यापूर्वी १ फूटावर असलेल्या माझ्या सहप्रवाशास उजवे बरगडीत जोरात दणका बसला तो बिचारा

काय घडते आहे हे समजण्यापूर्वीच रोडवर आडवा आदळून बेशुद्ध झाला, तेच चाक त्याचे निकट चालणारे इसमास जोरात धडक देऊन पुढे निघाले. हा दुसराही उजवे पायावर जोरात रोडवर आदळला पण तो बसकण मारून गप्पगार बसला व त्याचे शेजारीच मी होतो पण बाबांची कृपा म्हणूनच त्या भयंकर चाकाचा मला जराही धक्का लागला नाही व माझे अगदी जवळून पण माझे शरिरास स्पर्श न करिता ते चाक रस्त्याचे काठावर असलेल्या झाडावर आदळले.

देवाचे व सद्गुरु साईनाथाचे पूर्ण कृपा प्रसादाने मी वरील संकटातून अत्यंत सुखरुप सुटलो या मनाचे अवस्थेने बाबांना तेथेच साष्टांग नमस्कार केला.

जो रोडवर बेशुद्ध पडला त्याचेसाठी जवळच्या मळ्यातून पाणी मागवले त्याचे तोंडावर पाणी शिंपडले. त्याच बसमध्ये जि. प. चे शिरसोळी गावचे डॉक्टर होते ते काही कामासाठी भसावळ येथे जात होते त्यांनी त्या दोघा अचानक संकटात सापडलेल्या सहप्रवाशाना शक्य होते ते प्रथमोपचार केले. तेवढयात मागावून जळगाव सावदा बस आली. तिला थांबवून त्या दोघाना भुसावळ म्युनिसिपिल दवाखान्यात रवाना केले. नंतर आमच्या बसचे ते नादुरुस्त चाक काढून त्या ठिकाणी ते पराक्रमी वीरचक्र स्थापन करणेत १ तास गेला व आमचा प्रवास पुढे सुरू झाला.

जो जो माझे वरि विश्वासला ॥
त्याचा कार्य भाग साधला,

ह्या बाबांच्या ओळी आपोआप आठवल्या.

नित्य मी जिवंत जाणा हेंची सत्य ।
नित्य घ्या प्रचित अनुभवे ।

असे आयुष्यात येणारे प्रत्येक अनुभव जर मनोमन बाबांचे स्मरण करताना अनुभवास आले तर खरोखर असे वाटते माझा हा प्रभु सदैव अहोरात्र माझ्या सावलीप्रमाणे माझेबरोबर आहे. व तोच मला संकटातून सोडवित आहे. त्या त्याच्या अजाण स्पर्शाने मन सुखाने ओतप्रत भरून येते व नकळत आपोआप हात जोडले जातात.

त्या माझ्या बाबांना माझे शतशः–प्रणाम.

..............

# विश्वास नव्हता तो बसला....

● सौ. मालती वैकर
३०८, शुक्रवार पेठ,
अवस्थी वाडा, पुणे २

● डिसेंबर १९७५ च्या नाताळच्या सुट्टीत मी–सौ. मालवी वैकर–नानासाहेब अवस्थी यांच्या वाड्यात राहावयास आले. १५ ऑगस्ट १९७६ ला आमच्या ओळखीचे श्री. त्रिं. ब. साठे ( राहणार १२०० सदाशिव, लिमये वाडी, वेलणकर वाडा, पुणे ३० ) नवी जागा पाहावयास आले. त्यावेळी श्री. नानासाहेब अवस्थी साईभक्त असून त्यांनी साईबाबांच्या सहवासात काही दिवस घालविल्याचे मी सांगितले. श्री. साठे यांच्या पत्नी सौ. पार्वतीबाई याही साईभक्त असल्याने श्री. साठे यांनी श्री. अवस्थी यांच्या दर्शनाची इच्छा व्यक्त केली. भेटीमध्ये श्री. साठे यांनी आपल्या पत्नीला गेली ६ वर्षे दोन्ही डोळ्यांस अंधत्व आल्याचे सांगितले. यापूर्वी चार शस्त्रक्रिया होऊनही उपयोग झाला नव्हता. हे सर्व ऐकूनही श्री. नानासाहेब क्षणभर संचित बसले आणि त्यांनी उत्स्फूर्तपणे उद्‌गार काढले–"आपल्या पत्नीला एका डोळ्याने निश्चित दिसू लागेल."

त्यांच्या तोंडून साईवाणीच प्रकट झाली असा साठे दांपत्याचा गाढ विश्वास आहे.

सौ. साठे यांना भेटण्यासाठी स्वतः श्री. नानासाहेबच माझ्याबरोबर श्री. साठे यांच्या घरी आले. सौ. साठे यांची व्यथा त्यांनी समजावून घेतली–डोळ्यांवरून हात फिरवला. डोक्यावरही हात ठेवला. डोळ्यांना लावण्यास उदी दिली व श्रीसाईबाबांचा फोटो दिला आणि साईंचीच भक्ती चालू ठेवण्यास आग्रहपूर्वक सांगितले.

ते पंधरा दिवसानंतर येणार होते परंतु ईश्वरेच्छा बलीयसी ! अवघ्या दोन दिवसांनीच श्री. अवस्थी साईरूप झाले. त्यांची महायात्रा वैकुंठ स्मशानभूमीकडे जात असताना सौ. साठे यांना लावलेल्या नसूनही उदबत्त्यांचा घमघमाट जाणवला.

मार्च १९७७ पर्यंत डोळ्यांची अवस्था तशीच होती पण एका सुवर्णक्षणी अंतःप्रेरणा झाली व डाव्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेस सौ. साठे तयार झाल्या. दरम्यान

श्री. नानासाहेब रासने ( शिवाजीनगर साईमंदिराचे संस्थापक ) यांनीही साठे दांपत्याला धीर दिला होता.

डॉ. ए. डी. पटवर्धन या निष्णात डॉक्टरांनी केलेली शस्त्रक्रिया यशस्वी झाली व साईबाबांचा फोटो 'याचि देही याचि डोळा' बघण्याची सौ. साठे यांची इच्छा पूर्ण झाली. ही साई कृपाच !

कै. नानासाहेब अवस्थी यांच्या मुखातून साईबाबाच बोलले अशी साठे दांपत्याची नम्र भावना आहे. त्या रूपाने साईबाबांनीच आपल्याला दर्शन दिले अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे.

या प्रसंगापूर्वी मी नास्तिक होते- 'आपल्या पत्नीला जर दिसू लागले तर माझा साईबाबांवर विश्वास बसेल' असे मी श्री. साठे यांना म्हटले होते..

आज माझा विश्वास बसला आहे. जरी मी विज्ञानाला मानत असले तरी अंतःप्रेरणेलाही मी तितकेच महत्त्व देते.

................


# श्रीसाईलीला

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७७**

श्रीसाई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर सुवाच्य लिहून ते २० सप्टेंबर ७७ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे उत्कृष्ट चित्र किंमत सव्वा रुपया**

# दोन अनुभव

-श्री. अनिल केशवराव रसाळ
बिल्डिंग नं. २१, खो. नं. ३८२
बी. पी. टी. स्टाफ, क्वॉर्टर्स रेनॉल्डस्
रोड, वडाळा (पूर्व)

● जेथें जातो तेथे तू माझा सांगाती ।
चालविसी हाती धरूनीया ।।

प्रत्येक साईभक्ताला वरील ओळींचा पदोपदी प्रत्यय आलेला आहे. भक्ताला फक्त साईचिंतनाची, मननाची, ध्यानाची जबाबदारी! बाकीची चिंता साईमाऊली वाहाते. बाळाची भूक मातेला अगोदर, तसेच साईमाऊलीला भक्तांच्या गरजा, त्यांची जाणीव त्यांना होण्याअगोदर माहीत असते.

पाच जूनला सौ. ला आणण्यासाठी सकाळच्या हॉलीडे स्पेशलने मी पुण्याला गेलो. त्याच दिवशी संध्याकाळच्या गाडीने परत येणे आवश्यक होते. कारण घरी धाकटी बहिण एकटीच राहणार होती.

पुण्याला पोहोचल्यावर सर्वप्रथम सौ. ने मी जरी पत्र अगोदर लिहिले होते तरीही परतीची तिकिटे अगोदरच संपल्यामुळे रिझर्व्ह करता आली नाहीत असे सांगितले. सुट्टया संपल्यामुळे गाडयांना तुफान गर्दी असणार याची मला कल्पना होती.

आम्ही चार मोठी माणसे, तीन लहान मुले व माझी पाच महिन्याची मुलगी इतक्या जणानी मिरज एक्सप्रेसमध्ये दोन डब्यात चढून जागा शोधण्यासाठी घुसलो हात हालवत आम्ही सर्व खाली उतरलो. सौ. ने एका डब्यात आपण सरळ चढूया व जागा नाही मिळाली तर सरळ जमिनीवरच बसूया असे सांगितले. शेवटी तसेच ठरवले व तिसऱ्या डब्यात शिरलो. तिथेही खूपच गर्दी. आता काय करायचे या विचारात असताना एक मध्यम वयाचा माणूस उठला. त्याने सौ. ला जागा पाहिजे का? विचारले. तिने होय म्हटल्यावर आम्हा सगळ्याना घेऊन तो दोन बाकांकडे आला तिथे अगोदर बसलेल्या माणसाना त्याने यांच्यासाठी मी जागा धरली

आहे, असे सांगितले. ते उठले. आम्हा सर्वांना जागा मिळाल्यानंतर तो जरा वेळ माझ्याजवळ बसला. मी त्याला नाव विचारले. त्याने खरे असे नाव सांगितले. थोडया वेळाने त्याला काय वाटले कोणास ठाऊक. त्याने स्वतःचीहि जागा सोडली व म्हणाला, मी इंजिनच्या रूममध्ये बसेन. तो निघून गेला. गाडी सुरू झाली. शिवाजी-नगर आले, समोरच्या बाकावर बसलेल्या माणसाने मला तुमचा तो ओळखीचा माणूस कुठे गेला असे विचारल्यावर मी त्याला खरा प्रकार सांगितला की आमच्या-पैकी कोणीहि त्याला ओळखत नाही. तो एकदम म्हणाला की, त्याने तर सांगितले की 'तुम्हा सर्वांना तो ओळखतो व म्हणूनच तो तुमची वाट पहात होता.' यावर मी काहीच बोललो नाही.

कलियुगात नास्तिकता मोठ्या प्रमाणावर आहे. ईश्वराचे अस्तित्व हे शब्दाने सिद्ध करता येत नाही. कारण त्याचे अस्तित्व हा प्रत्येक भक्ताला क्षणोक्षणी अनु-भवाला येत असते. साखर गोड आहे हे कळण्यासाठी ती खावी लागते व त्याची गोडी अनुभवावी लागते. ज्याला परमेश्वराची गोडी आहे त्याच्या आयुष्याची गाडी तोच चालवतो असा अनुभव त्यालाच येईल, व तो म्हणूनच म्हणत असतो,

जेथे जातो तेथें तू माझा सांगाती ।
चालविसी हाती धरूनिया ।।

● १९७४ सालच्या गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी मनात एक विचार आला की, गुरुपौर्णिमेच्या दिवशी पूर्ण वेळ श्रीसाईबाबांच्या श्रवणभक्तीत घालवायचा.

अगोदर ठरवल्याप्रमाणे दादरच्या श्रीसाईनिकेतनमध्ये श्रीसाईबाबांच्या भक्तीगीतांच्या संग्रहाच्या प्रकाशन समारंभास कै. श्री, काकडे यांच्या कीर्तनास हजर रहाण्याचे ठरवले.

गुरुपौर्णिमेचा दिवस ! पूजा केली पण साईबाबांच्या आवडत्या गुलाबाच्या फुलाची आठवण राहिली नाही. श्रीसाईनिकेतनमध्ये शिरण्यापूर्वी माझ्या एका साईभक्त मित्राशी बोलताना मी त्याला खेदाने म्हणालो की, 'आज मी गुलाबाचे फूल बाबांना देऊ शकलो नाही' हे बोलणे आमच्याबरोबर थोड्या अंतरावर चालत असलेल्या एका तरुण साईभक्ताने ऐकले व तो म्हणाला, बाबांना तुमची इच्छा माहीत आहे.'

श्रीसाईनिकेतनमध्ये ऑफिसात गेलो तेव्हा भक्तिगीतांचा कार्यक्रम सुरू होण्याआधी गुलाबाचीच फुले वाटण्यात आली. मला दिलेले गुलाबाचे फूल मी बाबांना वाहिले. अशाप्रकारे माझी फूल वाहण्याची इच्छा श्रीसाईबाबांनी पूर्ण केली. ●

## तुमचे दत्तात्रेयासंबंधीचे सामान्यज्ञान किती आहे ?

[ पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे. ]

१) दत्त ही देवता आपल्या भक्तांवर ...... करणारी आहे.
अ) क्षमा, ब) दया, क) शांती, ड) क्रोध.

२) भगवान दत्तात्रेयाने ...... नामक दैत्याचा पराभव केला.
अ) व्योमासूर, ब) धूम्रवर्ण, क) मधुकैटभ, ड) जृम्भ

३) 'दत्त पुराण' हा संस्कृत ग्रंथ ...... यांनी लिहिला.
अ) वासुदेवानंद सरस्वती, ब) स्वामी चिन्मयानंदजी क) केवलानंद सरस्वती ड) अखंड आनंदजी

४) ...... हे स्थान म्हणजे भगवान दत्तात्रेयाचे निद्रास्थान होय.
अ) मूर्तिजापूर, ब) माहूर, क) पुसद, ड) धानोरा.

५) गुरुचरित्र अध्याय १३ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी ...... शहराला भेट दिल्याचा उल्लेख आहे.
अ) नाशिक, ब) नागपूर, क) नालासोपारा, ड) नांदेड

६) श्रीदत्तात्रेयाचे वसतिस्थान अखंडपणे ...... वृक्षाखाली असते.
अ) औदुंबर, ब) वड, क) नारळ, ड) चिंच.

७) 'भस्माचा डोंगर' पहावयाचा असेल तर तुम्हास ...... येथेच गेले पाहिजे.
अ) गदग, ब) गडहिंग्लज क) गोकर्ण महाबळेश्वर ड) गाणगापूर.

८) 'गुरुचरित्र' हा ग्रंथ ...... यांनी लिहिला.
अ) आनंदमूर्ति, ब) मुक्तानंद स्वामी, क) सरस्वती गंगाधर, ड) गंगागीरबाबा.

९) महाराष्ट्रातील बरीचशी दत्तक्षेत्रे ...... नदीच्या तीरावर आहेत.
अ) कावेरी, ब) काळू, क) कृष्णा, ड) कुंभी.

१०) अक्कलकोट स्वामींचे एकाकाळी निवासस्थान ...... पर्वतावर होते.
अ) अरवली, ब) अबू, क) सह्याद्री, ड) विंध्याद्री.

—सदानंद चेंदवणकर

उत्तरे

१) —ब, २) —ड, ३) —अ, ४) —ब, ५) —अ, ६) —अ, ७) —ड, ८) —क, ९) —क, १०) —ब.

## श्रीगुरु चरित्र

[ संपादन – ह. भ. प. श्री. रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर, प्रकाशक– श्री. धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई ४ पृष्ठे ६८८, किंमत ३० रुपये ]

श्रीदत्तोपासकांच्या नित्यपाठातला आणि पारायणातला हा दिव्य ग्रंथ महाराष्ट्र भाषेतील वेदच मानला जातो .ह. भ. प. श्री. रा. कृ. कामत यांनी अनेक वर्षें परिश्रम घेऊन शुद्ध केलेली ही पोथीप्रत आता सर्वमान्य व लोकप्रिय झालेली आहे; आणि म्हणूनच की काय या पोथीच्या सामंदेव प्रतीतील गुरुगीता अध्यायासह आतापर्यंत सात आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून नुकतीच प्रकाशित झालेली ही आठवी आवृत्ती आहे. या चरित्र पोथीतील टाईप चांगला व मोठा वापरण्यात आलेला असून प्रत्येक अध्यायाला पूरक व सूचक असे सुंदर चित्र पण कै. दलाल यांच्या कुंचल्यातून उतरलेले, रेखाटलेले आहे. तसेच कठीण शब्दाखाली अर्थ व टीपा, सूची इ. पण दिलेले असल्याने सामान्य भक्तालाही ही गुरु चरित्राची पोथी अत्यंत उपयुक्त ठरेल. प्रत्येक दत्तप्रेमी भक्ताने आपल्या संग्रही ही पोथी अवश्य बाळगावी अशी आमची शिफारस आहे. मुखपृष्ठावर श्रीभगवान दत्तात्रेय त्रिमूर्तींचे मनोहर पंचरंगी संग्राह्य चित्र असून प्लॅस्टिकच्या आकर्षक वेष्टनातून ही गुरु चरित्र पोथी सध्या उपलब्ध आहे.

## जय संतोषीमाता

[ लेखक – श्री. आबासाहेब आचरेकर, प्रकाशक – श्री. ग. का. रायकर, जयहिंद प्रकाशन, झावबावाडी, मुंबई २ पृष्ठे ६४, किंमत–दिड रुपया ]

श्रीसंतोषीमातेची उपासना भारतात कित्येक वर्षे चालत आलेली आहे. मूळचे नाटककार श्री. आबासाहेब आचरेकर यांनी आतापर्यंत लिहिलेल्या अनेक पुस्तकात हे संतोषीमातेचे पुस्तक खूपच लोकप्रिय झालेले आहे. या पुस्तकात शुक्रवारची कहाणी, संतोषी मातेची कथा, तिची पूजा अर्चा, तिच्या व्रताचे उद्यापन, आरती, तिच्या संबंधीची विविध गाणी, मातेची अनेक ठिकाणी असणाऱ्या मंदिरांची सूची इ. भरगच्च मजकूर दिलेला असून सोबत भेटीदाखल मांचे एक पंचरंगी मनोहर चित्र पण दिलेले आहे. एकंदर पुस्तक सचित्र असल्याने वाचनीय व संग्राह्य झालेले आहे.

वर्षातून पाच खास अंक प्रकाशित करणारे

मराठीतील एकमेव मासिक श्रीसाईलीला

१) रामनवमी विशेषांक
२) श्री दत्तगुरू विशेषांक
३) श्री पुण्यतिथी विशेषांक
४) दिवाळी भक्त स्वानुभव विशेषांक
५) श्रीसाई काव्यबहार विशेषांक

वार्षिक वर्गणी अवघी सहा रुपये (ट. ह. सह)


## श्रीं. नारायणराव गोरे यांचे निधन

● पुणे येथील संस्कृत व अर्धमागधीचे व्यासंगी विद्वान श्री. नारायणराव अनंत गोरे हे वयाच्या ६६ व्या वर्षी हृदयविकाराने अकस्मात् भगवंत चरणी विलीन झाले. श्रीसाईलीला पहिल्या लेखक-कवी स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून ते उपस्थित होते. विद्यार्थीदशेत त्यांनी जगन्नाथ शंकर शेट शिष्यवृत्ती मिळविली होती. ते मुंबईच्या रॉयल एशियाटीक ग्रंथालयाचे तसेच मराठवाडा विद्यापीठाचे प्रमुख ग्रंथपाल होते. पुण्याच्या स. प. महाविद्यालयात ते काही वर्षे प्राध्यापक होते. दक्षिणाफेलोशिपचा मान त्यांनी मिळविला होता. सुमारे १५ पुस्तकांचे संशोधनपूर्वक संपादन व शंभराहून अधिक लेख त्यांनी लिहिलेले आहेत. ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

# साईमाऊली आली अमुच्या घरी




मुंबापुरीतील एक साईभक्त छायाचित्रकार श्री. भोलानाथ रामनाथ समेळ ३/१५ शालवाला बिल्डिंग, ३४ बी, मुगभाट क्रॉस लेन गिरगाव मुं. ४ यांना सुविख्यात चित्रपट निर्माते व दिग्दर्शक कै. कुमारसेन समर्थ यांचे कुटुंबियांकडून केवळ भेटीदाखल लाभलेल्या भव्य श्रीसाईमूर्तीचे छायाचित्र सदरहू मूर्तीची प्रतिष्ठापना त्यांनी आपल्या निवासस्थानी काही दिवसापूर्वी केली त्यावेळी अनेक साईभक्त उपस्थित होते. श्री. समेळ यांना लाभलेल्या या अपूर्व भेटीबद्दल आम्ही त्याचे मनःपूर्वक कौतुक करतो.

# श्रीसाईबाबांचे मंदिर व आश्रम, कसौली



आपला भारत देश हा प्राचीन संस्कृतीचा महान वारसा असलेला असा देश आहे, तसेच त्यामध्ये विविध अशा देवदेवतांची असंख्य मंदिरे आहेत. ह्या देव-देवतांच्या आशीर्वादामुळे येथील जनतेला मानसिक व शारीरिक स्वास्थ्य लाभत असते. श्रीसाईबाबांच्या आत्यंतिक कृपेमुळे एक विचार १९७१ साली माझ्या मनात फार तीव्रतेने मला जाणवू लागला. उत्तर हिंदुस्थानातील सर्वसाधारण जनतेच्या कल्याणासाठी व विशेषकरून श्रीसाईबाबांच्या भक्त मंडळींच्या फायद्यासाठी, साई-बाबांचे एक मंदिर कसौलीला बांधावे, हा तो विचार होता. मनात आलेला विचार कितीही चांगला असला व त्यात मी काही काळ संपूर्णपणे गढून गेलो असलो तरी हा विचार कृतीत आणणे हे केवढे मोठे काम आहे हेही माझ्या सतत मनात आल्याशिवाय रहात नसे. माझ्या मनातील विचार तात्काळ कृतीत आणण्यासाठी जी साधने पाहिजेत ती आपणाजवळ नाहीत हे पाहून माझे मन पुन्हा पुन्हा व्यथित होत असे; परंतु एके दिवशी मात्र एक आश्चर्यकारक घटना घडली. कसौली येथील एका शिवमंदिरात मी गेलो असता तेथे माझ्या समस्येला एकाएकी उत्तर सापडले! माझ्या मनात एकदम प्रकाश पडला आणि शंकराच्या मंदिराच्या बाजूचाच प्लॉट साईमंदिरासाठी निश्चित करण्याचा दृष्टान्त मला झाला! अधिक विचारांती तोच प्लॉट सर्व दृष्टींनी सोईस्कर आहे असे मला वाटू लागले.

लगेच मी कामाला लागलो. जागेच्या मालकाला भेटून जागा विकण्याबद्दलची बोलणी त्याचेबरोबर सुरू केली. शेवटी साईबाबांच्या मंदिरासारख्या थोर कार्याला तो प्लॉट विकण्यास जमीन मालकाने कबुली दिली. ह्या कामासाठी अव्याहतपणे दोन वर्षांसाठी झगडावे लागले; परंतु श्रीसाईबाबांच्या कृपेने प्लॉटच्या खरेदीचे काम पूर्ण झाले.

संकल्पित इमारतीसाठी आवश्यक असलेला द्रव्यभार फार मोठा होता आणि तो मिळवण्याची चिंता यापुढे मला एकसारखी सतावू लागली, परंतु मला तिळमात्र चिंता वाटत नव्हती. साईबाबांचे आशीर्वाद व सर्व हितचिंतकांच्या सदिच्छा ह्या

शुभकार्याला असल्यामुळे त्या प्लॉटवरील खडक फोडून काढून तेथील उंचसखल जमीन सारख्या पातळीवर आणण्याचे काम आम्ही सुरू केले आणि थोड्याच दिवसात ती जमीन वास्तु उभारण्याच्या दृष्टीने सोईस्कर अशी झाली. देवळाबद्दलचे प्लॅन, त्याचा आकार, त्यावरील नक्षीकाम इत्यादि गोष्टीबद्दल ह्या क्षणापर्यंत माझ्याजवळ प्रत्यक्ष काहीच तयार मव्हते; परंतु पुढे ज्या अडचणी येतील त्या साईबाबांच्या कृपेने दूर होऊन हे महान कार्य योग्यवेळी पूर्ण होईल, ह्याविषयी माझी पूर्ण खात्री होती. म्हणून आम्ही कामाला सुरुवात केली आणि बाबांनी कामाला गति दिली. आजुबाजूच्या लोकांना आमच्या कामाची माहिती मिळताच श्रद्धाळू आर्किटेक्ट व इंजिनीयर माझ्याशी सहकार्य करण्यास तयार झाले व मंदिराच्या कामात रस घेऊ लागले. उत्तमात उत्तम अशा प्रकारचा देवळाचा आराखडा तयार करण्यात आला आणि मंदिराच्या कामाची सुरुवात तात्काळ करण्यात आली. मंदिराच्या बाहेरच्या भागाचे काम बरेचसे पूर्ण झालेले आहे ( फोटो पहा ) व त्यालाच सुमारे साठ हजार रुपये खर्च आला आहे. मंदिराचे काम पुढे चालू आहे आणि एकूण खर्च तीन लाखावर जाईल अशी अपेक्षा आहे. मंदिराचे काम पूर्ण होईल त्यावेळी ती एक अत्यंत आकर्षक अशी इमारत ठरेल व भारतातील व इतरत्र असलेल्या श्रीसाईबाबांच्या मंदिरात एक मोलाची भर पडल्याची जाणीव सर्व भक्तांस होईल असा आम्हास दृढ विश्वास आहे.

ज्यावेळी आमच्या आजूबाजूच्या लोकाना हे कळले की श्रीसाईबाबा आपल्या हयातीत शिर्डीच्या बाहेर कधीच गेले नाहीत, परंतु त्यांची देवळे मात्र भारताच्या कोना कोपऱ्यात बांधली गेली आहेत, त्यावेळी साईबाबांच्या मोठेपणापुढे ते नतमस्तक झाले व त्यांना ह्या गोष्टीचा फारच अचंबा वाटला. श्रीसाईबाबांच्या भक्तीचा प्रसार भारतातील सर्व जातीच्या, धर्माच्या व सर्व स्तरावरील लोकात किती झपाट्याने होत आहे ह्याचे कसौली ( सिमला ) येथील हे मंदिर व आश्रम हे अद्वितीय असे प्रतीकच होय.

प्रस्तुत मंदिरासाठी जास्तीत जस्त आर्थिक साह्य देण्याची विनंति सर्व साई भक्तास स्वतंत्ररीत्या करण्यात येत आहे आणि साईभक्तांच्या सक्रीय सहकार्याने हे मंदिर व आश्रम बांधण्याचे काम त्वरित पुरे होईल ह्या बद्दल मला तिळमात्र शंका नाही. ह्या जगातील दुष्ट प्रवृत्तीपासून दूर रहाण्यासाठी ज्या आध्यात्मिक शक्तीची आवश्यकता असते ती मिळविण्यासाठी साईभक्तांना प्रस्तुत देवळामुळे आणखी एक स्थान प्राप्त होईल असे वाटते.

श्री सद्गुरु साईबाबा सर्वांचे कल्याण करोत हीच त्यांचे चरणी नम्र प्रार्थना.

[ श्री. पी. एल. गोयल, कौशी व्हिला, कसौली १७३२०४ जिल्हा सोलन, हिमाचल प्रदेश ह्याच्या श्रीसाईलीला ( इंग्रजी आवृत्ति ) मासिकाच्या मार्च १९७७ च्या अंकातील लेखाचा डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी केलेला स्वैर अनुवाद –संपादक]

# शिरडी-वृत्त माहे जून सन १९७७

## गुरुपौर्णिमा उत्सव

● या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शिरडी दरबारी फारच गर्दी होती. गुरुपौर्णिमा उत्सव दि. ३०-६-७७ ते दि. २-७-७७ पर्यंत मोठया थाटात साजरा झाला. नामांकित कलाकार डॉ. सौ. ज्योत्स्ना मोहिले मुंबई, श्री. जयवंत कुळकर्णी मुंबई, श्री. चंद्रशेखर गाडगीळ पुणे, श्री. रमेश पिळणकर मुंबई वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या व श्री गोविंदस्वामी आफळे पुणे यांचे कीर्तन झाले.

**उत्सवाचा १ ला दिवस** :- गुरुवार दि. ३०-६-७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. गुरुवार असल्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. ५-१५ वाजता काकड आरती झाली. ६ वाजता श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. श्रींचे मंगलस्नान, अभिषेक पूजा, माध्यान्ह आरती नित्य कार्यक्रम झाल्यावर दुपारी ४ ते सायंकाळी ६-३० पर्यंत श्री. गोविंदस्वामी आफळे पुणे यांचे कीर्तन झाले. धूपारतीनंतर रात्रौ ७-३० ते ९-०० व ९-३० ते ११ पर्यन्त डॉ. सौ.ज्योत्स्ना मोहिले मुंबई यांचे गायन झाले. रात्री ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस** :-शुक्रवार दि. १-७-७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. सकाळी ६ वा. श्रींच्या साईसच्चरित ग्रंथाची अध्याय वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते सायंकाळी ६-३० पर्यंत श्री. गोविंदस्वामी आफळे यांचे कीर्तन झाले. धूपारती झाल्यावर रात्री ८ ते सकाळी ६ वाजेपर्यन्त उपस्थित कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. त्यात नामांकित कलाकार श्री. देवळणकर, श्री. दामूअण्णा दळवी, श्री. दैठणकर, श्री. जाधव, श्री. राजाभाऊ देशपांडे, जयवंत कुळकर्णी, श्री. चंद्रशेखर गाडगीळ, श्री. भेडा वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. रात्रौ ९-१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक वाद्यांच्या गजरात व साईनाम घोषात समाधि मंदिरातून

निघाली. श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक शिर्डी, राहाता बॅण्ड पथक, सिद्धेश्वर बॅण्ड पथक पुणे, अमरावती येथील बॅण्ड पथक, सनई-चौघडा, शिंगवादन, डफ, ढोल व साईभक्त कोळी लोक व इतर भक्तांचे भजन; गायन, नाच अशा थाटात मिरवणूक गावातून संस्थानचे भोजनगृहाजवळ आली.

त्या ठिकाणी ग्रामस्थ लोकांनी भारुड, गारुड, कार्यक्रम केले. पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर मिरवणूक मंदिरात आली व मिरवणुकीतील लोक कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाले. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस** :- शनिवार दि. २-७-७७ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सामुदायिक अभिषेक झाल्यावर सकाळी १०-३० ते १२ पर्यंत संस्थान कीर्तनकार श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कालाकीर्तन झाले. दही हंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व साईभक्तांना तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. रमेश पिळणकर पार्टीचे निरनिराळ्या प्रकारचे कार्यक्रम झाल्यावर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला. दुसरे दिवशी श्री. चंद्रशेखर गाडगीळ व पार्टी पुणे यांचा "सात सुरोंमें साईबाबा" हा कार्यक्रम झाला. गुरुपौर्णिमा उत्सवाची रुपरेषा कोर्ट रिसीव्हर माननिय श्री. का. सी. पाठक साहेब यांनी आखून दिली होती व कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

**माननीयांच्या भेटी** :-

१) मा. श्री. एच. बी. चव्हाण. व्हाईस चान्सेलर कोकण कृषी विद्यापीठ दापोली, रत्नागिरी
२) मा. श्री. टी. आर. देसाई, हायकोर्ट जज्ज गुजराथ स्टेट
३) मा. श्री. के. टी. राठोड, मंत्री कर्नाटक राज्य.
४) मा. श्री. गीब्ज साहेब, सी. ओ. धुळे.
५) मा. श्री. पी. एस. पाळंदे IAS कमिशनर इंडस्ट्रीज डिपार्टमेंट महाराष्ट्र मुंबई
६) मा. श्री. टी. जी. तुंगारे IAS मॅनेजिंग डायरेक्टर लॅ. ड. महाराष्ट्र मुंबई
७) मा. श्री. आर. एम. पांडे, राज्यमंत्री, मजूर पुनर्वसन पर्यटण खाते, महाराष्ट्र मुंबई
८) मा. श्री. शहा, सेक्रेटरी इंडस्ट्रीज व लेबर डिपार्टमेंट भारत सरकार.

**हवा पाणीः**– शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन** :– १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) सौ. इंदिराबाई ना. भालवणकर यांचे कीर्तन झाले.

३) ह. भ. प. रामदास महाराज यांचे कीर्तन झाले. (बुलढाणा)

४) ह. भ. प. राष्ट्रीय कीर्तनकार श्री. गोविंदस्वामी आफळे पुणे यांचे कीर्तन झाले.

**गायन भजन** :१) सौ. कांताकुमार, उत्तर प्रदेश. २) सौ. सुलभा ए. जोशी, मुंबई ५८. **वादन** : ३) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. ४) सौ. पुष्पा पागधरे, मुंबई. ५) श्री. प्रसाद बरसकर, मुंबई ६) श्री. गणपतराव, मुंबई ७) श्री. पागधरे, मुंबई. ८) श्री. जोशी, ९) श्री. वसंतराव. १०) कु. मेधा, मुंबई. ११) श्री. शिवाजी तु. धुमाळ, मुंबई. १२) श्री. विष्णू ना. धुमाळ, मुंबई. १३) श्री. जगन्नाथराव धुमाळ, मुंबई. १४) श्री. बापू वाडेकर, मुंबई. १५) श्री. भानू आचरेकर, मुंबई. १६) श्री. यशवंत त्र्यं. देव मुंबई १७) श्री. राजेश भा. देव, मुंबई. १८) श्री. बी. एस. शोभाकर, मुंबई. १९) श्रीसत्यसाई भजन मंडळ, मुंबई ५७. २०) कु. कालिंदी कोल्हटकर, मुंबई २१) श्री. कृष्णा का. रोले, मुंबई २२) श्री. राजेंद्रसिंह ठाकूर, बालाघाट. २३) श्री. प्रतापसिंह ठाकूर, बालाघाट. २४) श्री. बाबुराव वि. बांदिवडेकर, मुंबई. २५) श्री. श्रीकांत रत्ना, मुंबई. २६) श्री. मूर्ती आणि नवरंग साधना भजन मंडळ, साखरवाडी २७) श्री. गोपीराव भट, राजस्थान २८) श्री. देवराम का. वसाकें, जळगाव २९) श्री. ताराचंद न. वारूळे, बऱ्हाणपूर ३०) श्री. पुंडलीक न. वारूळे बऱ्हाणपूर ३१) ह. भ. प. बाळासाहेब माळवदकर पुणे. ३२) श्रीदत्त प्रासादिक भजनी मंडळी, नागपूर ३३) श्री. एस. एन. बॅनर्जी, ओरीसा. ३४) डॉ. सौ. जोत्स्ना मोहीले, मुंबई. ३५) कु. ज्योती पटेल, मुंबई. ३६) श्री. यशवंत आचरेकर, मुंबई. ३७) श्री. माधवराव थाटवळ, मुंबई. ३८) कु. समीरराव, मुंबई. ३९) श्री. सदाशिव गो. हटकर, मुंबई. ४०) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे. ४१) श्री. दिलीप द. गरुड, पुणे. ४२) श्री. ए. सुब्बाराव स्वामी, बंगलोर. ४३) श्री. सुरेशभाई पटेल, बंगलोर ४४) श्री. दिलीपभाई पटेल, बंगलोर. ४५) श्री. बिपीनभाई जरीवाला, बंगलोर. ४६) श्री. किरणभाई, बंलोर. ४७) स्वामी, बेंगलोर.ग ४८) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. ४९) श्री. मोहन दैठणकर, पुणे. ५०) श्री. व. श. ठिकर, मुंबई. ५१) श्री. दिलीपकुमार जाधव, कल्याण. ५२) श्री. विठ्ठल देवळणकर, पुणे. ५३) श्री. राजकुमार बार्शीकर, नगर.

५४) श्री. श्यामसुंदर भेडा, संगमनेर. ५५) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. ५६) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे. ५७) सौ. रश्मी गाडगीळ, पुणे. ५८) श्री. अनंत पांचाळ मुंबई. ५९) श्री. बाळासाहेब साठे, मुंबई. ६०) श्री. मोहन कृ. कलंबी, मुंबई. ६१) श्री. अरुण पिंपळकर,मुंबई. ६२) श्री. बाळ घडये मुंबई. ६३) श्री. वसंत बा. कुलकर्णी मुंबई. ६४) श्री. सुधीर सि. कद्रू. मुंबई ६५) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. ६६) श्री. रंगनाथ पांचगे, पुणे. ६७) श्री. श्रीराम सातर्डेकर,मुंबई. ६८) श्री. नामदेव पुं. सोलापुरे, पुणे. ६९) श्री. शिवाजी तु. धुमाळ, मुंबई. ७०) श्री. सदाशिवराव सांगली ७१) श्री. जयनाथ वाडेकर, नगर. ७२) श्री. महेश ज. कुळकर्णी, पुणे. ७३) श्री. दामूअण्णा दळवी. श्रीरामपूर. ७४) श्री. दत्तोबा गुरव शिर्डी. ७५) श्री. विठ्ठल वि. मांजरेकर, शिर्डी. ७६) श्री. लोणकर, म. पुणे. ७७) श्री. सुधाकर ना. कामेरकर,मुंबई. ७८) श्री. शंकर पा. तुपे, कोपरगाव. ७९) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. ८०) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिर्डी. ८१) श्री. प्रकाश स. पवार, पुणे. ८२) श्री. बाळासाहेब बिडवे, पुणे. ८३) श्री. पद्माकर बिडवे, पुणे. ८४) श्री. प्रसाद हुंडे, पुणे. ८५) श्री. सुधाकर हुंडे, पुणे. ८६) श्री. रामभाऊ बोडके, पुणे. ८७) सिद्धनाथ स्वामी, शिर्डी. ८८) श्री. राम गंगाराम खळमकर, पुणे. ८९) श्री. शाम द. खळमकर, पुणे. ९०) श्री. माधव तुपे, पुणे. ९१) श्री. ज्ञानोबा जाधव, पुणे. ९२) श्री. दत्ता राईतकर, पुणे. ९३) श्री. वसंतराव देवळणकर, पुणे. ९४) श्री. गंगाधर धो. जाधव, पुणे. ९५) श्री. माधवराव ग. दैठणकर, पुणे. ९६) श्री. वसंत दा. रासने, पुणे. ९७) श्री. बाळाजी पी. गुरव, शिर्डी. ९८) श्री. सुरेश लोणकर, पुणे. ९९) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. १००) श्री. बाळासाहेब तुळशीराम राऊत, नगर. १०१) श्री. रमेश पिळणकर व पार्टी मुंबई. १०२) श्री. चंद्रशेखर गाडगीळ व पार्टी, पुणे.

**आषाढी एकादशी :–** सालाबाद प्रमाणे आषाढी एकादशीनिमित्त रात्री कीर्तन झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

## मुंबई कार्यालय-वृत्त

नेहमीप्रमाणे स्थानिक दादर येथील कार्यालयातही उत्सव थाटात साजरा झाला. सकाळपासूनच श्रींचे साईभक्तांनी दर्शन घेतले. संध्याकाळी ४ ते ६ या वेळात जिजामाता भजन मंडळ, जिजामाता महिला मंडळ, शिवाजी मंदिर, दादर या संस्थेचा भजनाचा सुमधुर असा कार्यक्रम झाला. माध्यान्ही आरतीचे सुमारास बरीच साईभक्तमंडळी हजर होती. ●

## ॥ १ ॥ ॥ इच्छा ॥

श्रीसाई दयाघनारे । मज नित्य वाटताहे ।
शिरडीस येऊनिया । तुज सन्निध रे रहावे ।
तुझ्या मंदिरात देवा । कीर्तनात रंगूनिया ।
भजनांत दंग व्हावे । तुज सन्निध रे रहावे ॥ १ ॥
मशीदींत बैसुनिया । लीला तुझ्याच गाव्या ।
जात्यावरी बसुनी । ओंव्या तुझ्या म्हणाव्या ।
स्मरुनी तुझ्या लीला रे । जगतास विसरावे ॥ २ ॥

## ॥ २ ॥ ॥ दर्शन ॥

चला सख्यानो चला । जाऊं शिरडी क्षेत्राला ॥ ध्रृ० ॥
श्रीसमर्थ सद्‌गुरुसाई दर्शनाला
पावनतीर्थे पवित्रक्षेत्रे घडते चारी धाम यात्रा
घेतां श्रीसाई दर्शनाला ॥ १ ॥

भक्तिभाव हा येथे रंगतो
भक्तासवे श्रीसाई डोलतो
जो तो सांगे ज्याला त्याला
श्रीसाईसारखे दैवत नाही । अनुभव हा अपुला ॥ २ ॥

भक्ताकरिती त्रिकाळपूजन
सदैव चाले मनात चिन्तन
साई साई जय घोषानें कोंदतो परिसर हा सगळा ॥ ३ ॥
चला सख्यानो चला । जाऊं शिरडी क्षेत्राला ॥

–सौ. सुशीलाबाई हजारे
मालेगांव कँम्प, मालेगाव

# श्रीसाईलीला

घडली एकदा शिरडीत नवलाई।
गहूं दळाया बैसली सद्‌गुरु माऊली।
साईलीला पहाण्या धांवली शिर्डीची नरनारी।
बाबा दळत होते जात्यात वैरी।
चारलेकी धांवूनी आल्या।
बाबासंगे दळू लागल्या।
साईगीत गाऊनी आळविले।
पीठ पायलीचे पूर्ण जाहले।
लोभापायी बाया मनी करिती विचार।
बाबांना नाही बाईल संसार।
चार भाग कणिकेचे काढिले।
साई महाराज बहू रागावले।
शिवेवरी ओढियाकांठी पीठ तें सारा।
थांबेल मरी आईचा फेरा।
आदेश भक्तांनी पाळीला।
लाधले शांतत्व गांवाला।
साईलीलेची गाऊनी माधुरी।
वंदीते शांता साई तुज श्रीहरी।

—सौ. शांता अंबाजी सरोदे
उल्लेंगल बिल्डिंग, एन. सी. केळकर पथ,
दादर २८

# क्षमा करा श्रीसाईनाथा

क्षमा करा श्रीसाईनाथा
अपराध झाले महा
क्षमा करा श्रीसाईनाथा।
बाळपण गेले शिशु क्रिडा करण्या
तरुणपणी मन गुंतविले विषय वासना
वृद्धापण आले शरीर बनले जर जर
दारीं उभा यमदुत झाल्या चारी दिशा बंद
तेंव्हा दिसे एक आशेचा किरण
श्रीसाईबाबा तुमचे चरण
क्षमा करा श्रीसाईनाथा श्रीसाईनाथा

—उत्तम ज. मयेकर लालबाग १२

# घेऊनी साई नाम

(चाल–लेकर पहिला पहिला प्यार)

घेवुनी साई साई नाम
गाऊ बाबांचे गुणगान
साईबाबा हे संत आहेत महान ॥ धृ० ॥
शिरडीला आहे मोठे । बाबांचे ते स्थान
पावन हे होते मन । घेऊनी दर्शन
अगणित येती हे जन । घेती बाबांचे दर्शन
धन्य होते हे त्यांचे जीवन ॥ १ ॥

सोडूया रे चिन्ता आता । इहजन्माची
साईबाबा आहे उभे । आपुल्या पाठीशी
करी त्यांचे जो गुणगान । नाही त्याला कसली वाण
साईबाबांच्या भक्तांना । असे वरदान ॥ २ ॥

–सुभाष अनंत वैद्य, एम. कॉम.
१०३ रेडिओ कॉलनी, इन्दोर (म. प्र.)

# माझा साई

साई माझी गंगा, साई चंद्रभागा
मग मी का उगा तृषित राहावे ।
साई कृष्णनाथ, साई गुरुनाथ
मग मी उदास मनि का राहावे ।
साई सावकार, साईच कुबेर
मग का दरिद्री मी मज समजावे ।
साई कृपामय, साई दयामय
मग मी का प्रेम धुंडित राहावे ।
साई अन्नदाता, साई मोक्षदाता
मग मी का नित्य काळजी करावी ।
साई भगवंत, साई कृपावंत
असता मी पापी म्हणून का व्यावे ।

–सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन बंदर रोड, रत्नागिरी

# श्रीसाई प्रार्थना



हे दत्त साई, दया के सागर, हमारे पालन हारे हो,
माता पिता बन्धु भगिनी, साई सखा हमारे हो।
नित्य प्रेम दे कर साई, भक्तों का पालन करते हो
करुणा के सुख सागर हो, सारे संकट हरते हो।
दीन बंधु हम भक्तजनों को, धन, बल, ज्ञान प्रदान करो,
साई प्रेम की ज्योति जगा दो, सबको भक्ति दान करो।
साईनाथ यही है बिनंती करुणा कर स्वीकार करो,
शिरडी शरण आये हैं हम, साई बेडा पार करो।

–प्रा. गुंडेराव पटवारी
'साहित्य रत्न' एन्. एफ. जे. कॉलेज
बिदर ५८५४०१

# ओवाळू आरती जय श्रीसाईनाथा

(चाल–आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्मा !)

ओवाळूं आरती जय श्रीसाईबाबा
संकटीं धावुनी येसी, तूं भक्तांचा त्राता ॥ धृ० ॥
शिर्डी स्थानी प्रकट होऊनी दर्शन तूं दिधलें।
हिंदू मुस्लिम संगम करुन भांडण मिटविले।
मशिदी वस्ती करूनी देवा अग्नीला पूजिलें।
कफनी धारण करुनी तूं सांगितली गीता। ओवाळूं आरती...॥ १ ॥
पाण्याने दिप पेटवुनी तूं केलिस दिपवाळी।
व्याधिमुक्त केले भक्तांना उदी लावूनी भाळीं।
होऊनी साईबाबा अमुचा आम्हा सांभाळी।
आशिर्वच देऊनी होसी तूं सर्वांचा पिता। ओवाळूं आरती...॥ २ ॥
जें जें ज्याचें दैवत तें तें तुझ्या रुपीं दिसतें।
तुझ्या दर्शनें दुर्धर पातक भस्म नष्ट होते।
नाम जपातें तुझ्या अंतरी शांती आम्हा मिळते
संकटी धावुनी येसी, तूं अमुचा सुखदाता। ओवाळूं आरती...॥ ३ ॥

––सौ. प्रिया श. नाबर,
४, बनाम हॉल क्रॉस लेन,
गिरगांव, मुंबई ४

# 'साई अवतरी शिरडी नगरी'

साई अवतरी शिरडी नगरी ॥ ध्रु ॥
जेंव्हा आंग्लदेशीय राज्यकरी ।
भारत देशीय हिन्दू-यवनामनी ॥
करुनी निर्माण भावना भेदभावाची ।
येथे अपुरे राज्य स्थिरावया प्रसन्न करी ॥
तेंव्हा करावया कृपा भारत जनतेवरी ।
अवतरी बाबा साई शिरडी नगर
साई अवतरी शिरडी नगरी ॥ ध्रु ॥
साई अवतरुनी शिरडी नगरी ।
करुनी वास मशीद-मंदिरी ॥
निर्मुनी भावना एकात्मतेची ।
बोधुनी हिन्दू-यवनामनी विश्वशांती ॥
लावुनी नांदावया प्रेमभावे ।
स्थिरावली भारतदेशी चिरशांती ॥
साई अवतरी शिरडी नगरी ।
साई अवतरी शिरडी नगरी ॥ ध्रु ॥

—प्रिं. श्री. अमिनगड एम. एम.
एम. ए. एम. एड.
मु. पो. गुळूंचे, ता पुरंदर, जि. पुणे

# परमहंस साईनाथ

परमहंस साईनाथ । स्वयंप्रकाश दिनानाथ ।
शिर्डीमाजी वास नित्य । नितांतीक आनंदीत ।
तेजःपुंज भव्य मूर्ति । भक्त करिताती आरती ।
निंबवृक्ष अति मधुर । धुनी प्रज्वलित निरंतर ।
उदी प्रसाद घेत भक्त । भवरोग ताप हारित ।

— सति कमलाताई उपासनी महाराज,
साकुरी, पो. राहाता

# 'स्मरू नित्य साईसमर्थ । याच मंत्रे साधू परमार्थ'

चित्र साईनाम स्मरणी । दृष्टी साईसमर्थ चरणी
वृत्ति साईध्यान धारणी । देह साईच्या कारणी
साईसमर्थ करुणाघन । साईसमर्थ आज्ञापण
अंतरसाक्ष साई समर्थ । बुद्धीप्रेरक साईसमर्थ
सर्वगत साईसमर्थ । श्रीसद्गुरु साईसमर्थ
स्मरू नित्य साईसमर्थ । याच मंत्रे साधू परमार्थ
दयाघन साईसमर्थ । प्रणतपाल साईसमर्थ
शिरडीचे साईसमर्थ । अंतर्ज्ञानी साईसमर्थ
ब्रह्मसनातन साईसमर्थ । गुरुमाय साईसमर्थ
भक्तधारक साईसमर्थ । भक्तीपेठ साईसमर्थ ।
कृपासागर साईसमर्थ । दयासागर साईसमर्थ
फलदायक साईसमर्थ । शांतिसागर साईसमर्थ
कृपामूर्ति साईसमर्थ । छात्र आम्हा साईसमर्थ
ते तो निर्धार ब्रह्मलेख । मुखी वदले जे साईसमर्थ
संत पवित्र साईसमर्थ । वंदाचरण साईसमर्थ
चुंबकमणि साईसमर्थ । ब्रह्मक्षात्र तेज साईसमर्थ
ब्रह्मस्वरूप साईसमर्थ । दत्तरुप साईसमर्थ
पुण्यात पुण्य अन्नदान । ऐसे वदले साईसमर्थ
प्रणत वत्सल साईसमर्थ । सर्वज्ञानी साईसमर्थ
साईमुखमं साईसमर्थ । धन्य धन्य साईसमर्थ
दीनदयाळ साईसमर्थ । मूर्तिमंत परोपकार साईसमर्थ


कै. दत्तकुमार लक्ष्मणराव कळसकर
बोडके बिल्डिंग, मुलुंड

## श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथिनिमित्याने
## अभिनव स्पर्धा

### सुंदर निबंध लिहा व श्रीबाबांच्या सहवासात
### तीन दिवस विनामूल्य रहा.

भगवान संत चूडामणि श्रीसाईबाबा अनंतात विलीन होऊन पुढीलवर्षी साठ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्याने एक अभिनव व मराठी साहित्यात प्रथमच व नाविन्यपूर्ण अशी स्पर्धा आयोजित करीत आहोत ही स्पर्धा सर्व साईभक्तांना खुली आहे यासाठी स्पर्धेतून भाग घेणाऱ्याने पुढे दिलेल्या विषयावर सुमारे ४ फुलस्केप पाने एवढा निबंध लिहावयाचा आहे.

विषय— १) साई भजनी मन रमले
२) माझी साई भक्ती
३) श्रीसाई–एक अवतार

स्पर्धेत भाग घेणाऱ्या भक्ताने एकावेळी एकच निबंध लिहावयाचा आहे. मजकूर कागदाच्या एकाच बाजूस समास सोडून सुवाच्च अक्षरात व मराठी शुद्धलेखनाच्या पद्धतीला धरून लिहिलेला असावा. ही अट न पाळल्यास निबंध कितीही चांगला असला तरी तो परत पाठविला जाईल. निबंध पाठविण्याची अंतीम तिथी विजयादशमी १९७७ ही आहे. या तारखेनंतर आलेले कोणतेही निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध पाठविणारा स्पर्धक श्रीसाईलीलेचा वर्गणीदार असला पाहिजे.

आलेल्या सर्व निबंधावर परीक्षक मंडळ जो निर्णय देईल तो अखेरचा समजला जाईल.

प्रथम व द्वितीय क्रमांकाचे निबंध ठरलेल्या स्पर्धकाना जानेवारी १९७८ मध्ये श्रीसाईबाबांच्या शिर्डीस तीन दिवस विनामूल्य येऊन राहण्याचे निमंत्रण पाठविले जाईल.

परीक्षक मंडळाने निवडलेले दोन्ही निबंध व यशस्वी उमेदवारांची नावे श्रीसाईलीला १९७८ च्या अंकात प्रसिद्ध केली जातील.

—संपादक श्रीसाईलीला

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | साई किर्तनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२४) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२५) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२६) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२८) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |